
त्रिवेणीसंगम

# त्रिवेणीसंगम

## अरुण कुळकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

# त्रिवेणीसंगम

लेखक- अरुण कुळकर्णी
८,ग्रीनपार्क सोसायटी,
सुसेन-तरसाली रोड
वडोदरा-३९००१०
मो. ०७३५९२१२२११,
Email- Kulkarni@technique-baroda.com
Arungk1943@gmail.com

या कथांचे सर्व अधिकार ©
श्री. अरुण गणेश कुळकर्णी किंवा त्यांचे वारस श्री रविंद्र अरुण कुळकर्णी
८, ग्रीनपार्क सोसायटी,
मकरपुरा रोड बडोदा ३९० ०१० यांच्याकडे आहेत.
मो. ०७३५९२१२२११ 7228884030किंवा ०९८२४०१५२६२
Email- kulkarni@technique-baroda.com
Arungk1943@gmail.com

या कथांचे सर्व अधिकार वरीलप्रमाणे असून कोणत्याही कथेचे कथावाचन, नाट्यरुपांतर अथवा सिनेरुपांतर करण्यासाठी कॉपी राईट मालकाची लिखित परवानगीची जरुरी आहे.

ई प्रकाशक :
ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com
ई प्रकाशन : २७ ऑगस्ट २०१६
©esahity Pratishthan®2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत

मराठी साहित्य रसिकानी माझ्या “एकटे जीव” व “इनामदारीण” या दोन पुस्तकाना सुंदर दाद दिली. ही दोन पुस्तके २०१२ मधे प्रसिद्ध झाली होती. मार्च २०१६ मधे डिजिटल प्रत ई-साहित्यने प्रसिद्ध केल्यावर देश विदेशातून खूपच सुंदर प्रतिसाद मिळाला.

आज “मैत्रबंधाच्या गाठी” या तीन कथा डिजिटल प्रत रूपात ईंटरनेटवर वर प्रकाशित करताना मला खरोखरच आनंद होत आहे. पुस्तक प्रसिद्ध करण्यासाठी प्रकाशक तयार नसतात. वाचकांचा दुष्काळ पडला असावा असा भास होत असताना ईंटरनेट सारख्या माध्यमातून गोष्टी अचूक वाचकांपर्यंत कोणत्याही खर्चाशिवाय पोचवण्याचा मार्ग सापडला.

लहानपणापासून कोंकणात जे पाहीले, अनुभवले त्या कित्येक प्रसंगांची, व्यक्तींची, व्यंगांची, चालीरीतींची अनेक प्रतिबिंबे मनावर कोरली गेली होती. मनाच्या सांदीकोपऱ्यात दडलेल्या या गोष्टींनी रीटायर झाल्यावर मनात फेर धरला आणि कागदावर झरझर उतरत गेल्या.

लहानपणीच्या निरागस मैत्रीचे बंध वर्णीत करणाऱ्या या कथा तुम्हाला विचार करायला लावतील पण वाचनाचा निर्भेळ आनंदही देतील.

स्वातंत्र्या नंतरता तो काळ. त्यावेळी सर्वचजण गरीब होते. प्रत्येक जीवनोपयोगी वस्तुची चण चण होती. दुसऱ्या युद्धानंतर सर्वच गोष्टींचे रॅशनिंग चालू झाले होते. प्रत्येक जण जगण्याची धडपड करत होता. आपल्या आयुष्याची वाटचाल कण्हत कुंथत करीत होता. त्या हाल अपेष्टातही काही लोकांचे जीवन जवळून पहायला मिळाले. किशोरावस्थेत त्या माणसांची चित्रे मनावर कोरुन ठेवली. ती अशी गोष्टीतून सुमाक्का, गोमती, व पाऊ या रुपाने कथेत उतरली. कधी मनावर ओरखडे उठवणारे प्रसंग, कधी मजेशीर प्रसंग, कधी कांही शिकवून जाणारे प्रसंग पकडून त्याची प्रतिबिंबे मनात साठवण्याची एक सवय पडून गेली आणि पुढेही चालू राहीली. आयुष्याच्या वाटचालीत कोंकण, कोल्हापूर, सांगली, मुंबई करत बडोद्याला पोहोचेपर्यंतची ही असंख्य प्रतिबिंबे मी चित्रित करायची ठरवली. व लिहू लागलो. “एकटे

जीव" मधल्या व्यक्तिरेखा आणि या "मैत्रबंधाच्या गाठी" मधल्या गोष्टी या सर्व प्रतिबिंबांचा आलेख आहे.

या पुस्तकात मी कांही प्रयोग केले आहेत. सुमाक्का ही गोष्ट गद्य व पद्य यांचे मिश्रण आहे तसेच बायकानी न बोलताच सर्व सहन करण्याचा परीणाम किती भयंकर होतो तेही या कथेत दाखवले आहे.

यातील दोन कथा मेनका मासिकातून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या अनुक्रमणिकेत दर्शविल्या आहेत.

आपल्याला या कथा आवडल्या का? आपण जरूर कळवा त्यातील चुकांसह कळवल्यात तर फार आनंद होईल. जरूर ई मेल करून आपला अभिप्राय कळवावा.

अरुण कुळकर्णी

Kulkarni@technique-baroda.com or

Arungk1943@gmail.com

Mobile- 07359212211

07228884030


# त्रिवेणी संगम

**सरिता-**

काय चाललंय समजत नाही. आई व बाबा एवढे आनंदात कसे बोलू शकतात? गेल्याच वर्षी तर महिमाचे लग्न झाले. तिच्या सासरच्यानी अगदी सगळे मागून मागून वसूल केले. बाबांची सगळी जमा संपलीच पण मला देखील माझ्या पगारातून वाचवलेले अर्धे अधिक द्यावे लागले. आणि आता ताबडतोब मला बघायला येणार? कसे जमणार? मुलगा म्हणे फार शिकलेला आहे. मॅनेजर आहे मोठ्या कंपनीत. तो काय फुकटात लग्न करणार माझ्याशी? का धांवतायत हे विनाकारण? कुठून पैसे उभे करणार आहेत? बघायला येणार आहे म्हणे! येऊ देत तर खरं! मलाच काही तरी करायला लागेल. आई बाबाना नाही झेपणार खर्च आत्तांच.

बघायचा कार्यक्रम ठरवतायत. कसलं काय! न झेपणाऱ्या उड्या मारायची सवयच आहे बाबांना. देवाने देखील काय घाट घातला बघा. आम्ही दोघी मोठ्या व मगचे दोन भाऊ. मोठी व मी मागोमागच्या तर मग भाऊ चांगले आठ व दहा वर्षानंतर झाले. अजूनही शिकताहेत. महिमाच्या लग्नानंतर तिचा पगार बंद झाला. आता घरात माझा व बाबांचाच पगार येतो. बाबांचा घोष चालू असतो "तिचा पगार वापरू नका. बँकेत ठेवा. लग्नाला पैसे कुठून आणणार?" काही पण बडबडायचे. यांचा पगार तो किती? त्यात पाचजणांचे थोडेच भागणार! आई मग गपचुप पैसे मागते. दिलेच पाहिजेत तिला महिना पुरा करायलाच लागतो ना. महिमाच्या लग्ना नंतर हळू हळू बँकेत पैसे टाकणे बंदच झाले होते. सगळे मिळून अडीच तीन हजारच होत होते. आणि म्हणे हिचे लग्न करू! कुठून आणणार पैसे? बरे लग्न

केले की माझाही पगार बंद, मग जगणार कसे हे लोक? भावांचे शिक्षण नको पुरे व्हायला? मी शिकायची राहिले, नोकरी करणे जरुरी म्हणून पटकन नोकरी मिळवली. सरकारी नोकरी मिळत होती ती सोडू कशाला. माझे वय पण कुठे जास्त झालेय २२ तर आहे. आणखी दोन तीन वर्षे थांबले तर काय. लहानभाऊ १२ वर्षाचा, मोठा १४ वर्षाचा. ते शिकून कमवायला लागायला अजून दहा वर्षे लागतील. तोपर्यंत बाबांच्या ५००रुपये पगारात कसे होणार? आईची वाट लागणार दुसरे काय? डोके भणभणायला लागलेय झोपुया. पाहू काय होते ते.



**सुभाष-**

माई मागे लागल्यात, मुलगी पहा तरी म्हणून घोष लावलाय. मला अजून फ्लॅटची सोय करायचीय. बुक केलाय पण काम रेंगाळत चाललेय. गावचाच बिल्डर आहे पण सगळं काही सांगत नाही. पैसे दिलेत त्याच्या रिसीट दिल्यात पण त्यावर फ्लॅट नंबर नाही. काय करणार एवढ्यात  लग्न करून. माई म्हणतात “२६ वर्षाचा झालास, अजून किती थांबणार? वेळीच लग्न केलेले बरे. माग जागा सासऱ्याकडे.” मी तर हुंडा घेणाऱ्यांवर राग धरणारा. काहीच घ्यायचे नाही हे पक्के ठरवलेय. हुंड्याची प्रथा थांबवा म्हणून मोर्चा काढून मी मोकळा झालेला. मीच जर हुंडा मागीतला असता सगळे ओळखीचे टपलेच होते. लग्न पण खर्चाळू नको, अगदी साधे करायचे.

पण हे मीच कसे ठरवणार. मुलीचाही विचार तसाच असेल तर बरे. माई माझ्या अटी विचारत असतात. काय अटी सांगणार? लग्न आहे ते, मने जुळणे हीच मोठी अट. माझ्या कर्तृत्वावर माझा विश्वास आहे. चांगली साथ मिळणे हेच लग्नाचे उद्दीष्ट. मी जरा जेवणाचा चोखंदळ माणूस. जेवण मात्र सुंदर करणारी असली म्हणजे झाले.

माई म्हणत होत्या घर चांगले आहे. ओळखीतलेच लोक आहेत. कुटुंब नावाजलेले आहे. सध्या त्यांची परिस्थिती चांगली नाही हे खरे, पण कुटुंब पहावे. परवा संध्याकाळी मुलगी पहायला जायचे आहे. चला पाहू काय होते ते. माई येणारच बरोबर.

**सरिता-**

मी नाही नाही म्हणत असताना बाबांनी बघण्याचा प्रोग्रॅम ठरवलाच. काय मनचे मांडे खाताहेत हे लोक. नसता चहापाण्याचा खर्च करणार, मग आई महिन्याच्या शेवटी उसासे टाकत बसणार. बाबा पण काय तरी मनाचेच करतात. जरा विचार तरी करावा. सगळ्या गोष्टी ताडून मगच हो ना करावे. कसलीच व्यावहारिक समज नाही. कसला दाखवण्याचा घाट घालतायत हे. आणि मुलगा तरी कशाला येतोय पहायला? त्याला सांगीतले नाही काय माझ्याबद्दल, शिक्षणाबद्दल? मुलीची माहिती तर कसून करतात. मग हा कसा काय येतोय?

काहीतरी गडबड असणार. लंगडा, लुळा, आंधळा तर नाही मग कसा असेल? काण्या तरी असेलच. आली का पंचाईत. काणे व चष्मेवाले मला मुळीच आवडत नाहीत. ते नक्की कोणाकडे बघतात ते समजतच नाही. बायकोला अंधारात ठेवून इतर बायकाकडे बघायची सगळ्याच पुरुषाना खोड असते. पण काणे आणि चष्मेवाले बयकोला राजरोस शेंडी लावतात. नकोच असला काही नवरा.

कायरे बाबा! किती विचार? संपतच नाहीत. हा पहाण्याचा सोहळा डोक्याची वाट लावतोय. नाही म्हटले तरी विचार गर्दी करतात. काय काय रुढी घालून ठेवल्या आहेत या? संध्याकाळपर्यंत डोकं राहिल ना बरोबर. जाऊ दे! मनात उभार नाही ना, मग तयारीच नाही करायची संध्याकाळी. काय होईल ते बघू मागाहून. बाबा रागावतील. तडातडा बोलतील. आईला समजावले की जरातरी समजेल. नाहीतरी मला एवढ्यात नकोच आहे लग्न. चला जरा डुलकी काढुया.

**संवाद-**

आई “अग झोपलीस कुठे? तुला बघायला येतच असतील. ५ वाजता येतो म्हणालेत. चल जरा आंघोळ करून तयारी कर. बाबांनी मोगऱ्याच्या वेण्या आणल्यात. जरा चांगली साडी नेस.”

सरिता “चल ग! काय कौतुक चालवलंयस. सांगीतलं ना एकदा मला नाही करायचं लग्न एवढ्यात . कशाला जीव खाता सगळे?”

आई “बस झालं हां! पुरे कर बडबडणं. अग मुलीचं लग्न वेळेवर झालं की आई बाप सुटकेचा श्वास सोडतात. नशिबाने चांगलं स्थळ आलंय, तयार हो. नायतर घरात रामायण करून ठेवशील. हे जमदग्नी आहेत माहीत आहे ना? नाही तयार झालीस तर तुझ्याबरोबर मलाही कठीण जातील पुढचे दिवस.”

सरिता “काय तर म्हणे बघायला येणार! मुलींनाच का बघायचं, मुलाना का नाही? आणि हे कोण एकटेच ठरवणारे, पसंती नापसंती. मी होईन तयार. जा तू.”

आई “कोणी सांगीतलं, तुला पसंती नाही? नाही आवडला तर नाही म्हण की. आम्ही काय जबरदस्तीने लग्न लावणार का तुझं? पण ते बघायला येणार तर पुढ्यात नको जायला? अग अपमान होईल त्यांचा. व आपल्याला बोल लागेल. समाजात समजले तर कोणीही येणार नाही तुला पहायला.”

सरिता “सांगीतलं ना होते तयार. जा तू आता. नको उठवूस डोकं माझं.”

**सरिता-**

बाहेर आलेत वाटतं आंघोळीला गेले तेव्हाच आलेले दिसतात. चला आता कोणी यायचे नाहीत डोके खायला. काही नाही, घरच्याच साडीत रहायचे. कशाला नट्टापट्टा करायचा. लग्न झाल्यावर काय सदा सकाळ नटून जाणार आहे काय समोर. बघ म्हणावं घरच्याच साडीत. नाहीतरी लग्न केलंस तर तशीच बघावी लागणार ना दररोज? तेव्हा नको वाटायला नटलेली कुठे नी हे ध्यान कुठे.

बाहेर बोलताहेत सगळे. माईंचा आवाज येतोय. काय मुलाला सहा महिने लग्न नको? ब्लॉक तयार झाल्यावर लग्न? मग आलास कशाला बघायला? सिनेमाचे ऍडवान्स बुकिंग वाटले काय लग्न ठरवणे? शहाणाच दिसतोय. आणि बाबा काय सांगताहेत चालेल म्हणून. मला चालले पाहिजे ना! आता कोण बोलतंय हे. आवाज धारदार वाटतोय. बोलणे समर्पक व लाघवी वाटतेय. तोच तर नसेल. अनावर इच्छा होतेय डोकावून बघायची. पण त्याचे तोंड माझ्याच कडे असले तर! नको रे बाबा.

आई सांगतेय चहा घेऊन येते म्हणून. बाजूला होऊन साड्या बघायचं नाटक करूया. मग तीच जाईल चहा घेऊन. मागाहून पाहू. जेवढं टाळतां येईल तेवढं टाळू.

**संवाद-**

आई “अग! काय ग हे अजून तयार नाहीस? चल लवकर तयार हो. खरं तर चहा घेऊन तूच जायला पाहिजेस. पण कोण सांगेल तुला. महाहट्टीपणा भरलाय अंगात.”

सरिता “जा तू चहा घेऊन. सांग अजून तयारी करतेय. होते तयार जेवढ्या लवकर होता येईल तेवढे.”

आई “चांगला वाटतो ग मुलगा, सरळ वाटतो. आंघोळीला गेलीस आणि लगेचच आले. कोणी नाही, माई व मुलगाच आलाय. बाबांनी हळू हळू सगळी माहिती काढायला सुरवात केली तर म्हणतो कसा, थांबा मीच सांगतो सगळं. मग सगळं सांगून टाकलं. गाव कुठला, शिकला कुठे, शिक्षण किती, भाऊ, बहिणी, आई, वडील सगळं सगळं स्पष्ट सांगीतलं. वर म्हणाला तुम्ही आणखी काय पाहजे तर विचारा. मुलीच्या आई वडलांना काळजी असणं सहाजिक आहे. बाबा तर गप्पच झाले. सडेतोड व स्पष्ट बोलणारा आहे.”

सरिता “असू देत, मला काय करायचेय! . काय ते आटपा लवकर.”

आई “अग आम्ही काय आटपणार! तू तयार होवून ये तर खरं बाहेर. मगच आटपेल ना? काय सोंगं करीत बसलीय.”

**सरिता-**

आईचा चहा उकळू लागला. आई कप तयार करून निघाली. मी परत बाहेर कान लावून ऐकू लागले. समजेना का ऐकतेय मी. लग्नच नाही करायचे तर कशाला ऐकतेय. आई बाहेर जाताच बाबांचा आवाज आला. विचारत होते मी का नाही गेली चहा घेऊन. तयार होतेय समजल्यावर म्हणतात कसे आटप म्हणावं लवकर. मला मजा येत होती. तेवढ्यांत ऐकू आले. तो बोलत होता. जरा लवकर होईल तर बरं. त्याला म्हणे आठ वाजता कोणाला तरी भेटायचंय. मग आलासच कशाला रे. जायचं होतंस कुठे ते. पण एक खरे. बोलणे मात्र विनंती करणारे, तरीही हुकमी वाटत होते. आता मात्र नक्की जावे लागणार. मी अगदीच अजागळा सारखी होते. घरचीच पण जरा बरी पिवळी साडी नेसली. वर काळा ब्लाऊज घातला. केस ओलेच होते म्हणून तसेच सोडले. मलाच कळलं नाही असे का केलं. बोलवा आता मग जाऊ. नाहीतरी तो कसा आहे ते तर बघू. पाचच मिनीटांत आई पोहे घेऊन यायला सांगून गेली. प्लेटस् भरल्या व बाहेर गेले. मधल्या टेबलावर ट्रे ठेवला व कोपऱ्यातल्या खुर्चीत जाऊन बसले. जिथे कमीत कमी उजेड होता.

बाबांनी उठून सगळ्याना एक एक डिश दिली व स्वतःही घेतली. माझी एक डिश ट्रेत उरली होती. मी काही घ्यायला उठली नाही. आई खुणवीत होती, बाबांनी डोळे वटारले. मुलगा गप्प पोहे खात होता. तसा चांगला उंचापुरा होता. सांवळा होता. कपडे व एकंदर जामानीमा टापटिपीचा होता. चेहेऱ्यावर शांत भाव होता. पण कसल्या तरी विचारात असावा असे वाटत होते. काय चाललेय त्याच्या मनात?

**सुभाष-**

तयारी करतेय म्हणत होते. ही तर घरच्याच कपड्यांत आलीय. केस सुद्धा मोकळे सोडलेत. हिचे आई वडील हिच्यावर जबरदस्ती तर करीत नाहीत? केवढा वेळ घेतला बाहेर यायला. बहुतेक काहीतरी प्रॉब्लेम आहे. माईलाही समजले असणार. पोहे आणले तेही ठेवून गेली. प्रत्येकाला देणे हे माहीत नाही हिला? का अशी वागली असेल? हे सांगताहेत, मुलीशी बोलायचे असेल तर बोला. काय बोलणार? तिची इच्छा दिसत नाही, मग उगाचच सोपस्कार का? चला! माई लवकर आटपेल तर बरे होईल. परत चहा आला. सर्वांचा संपला तशा माई उठल्या.



**संवाद-**

“काय रे! काही बोलायचेय काय तुला? नसेल तर निघुया. मला घरी जाऊन जेवण करायचे आहे.” माई

“नाही, चल, निघूच.” सुभाष.

“अहो पत्रिका वगैरे आणलीत का? नाही म्हणजे दाखवून पाहू.” सरिताचे वडील

“माझा विश्वास नाही यावर.” सुभाष.

“नाही हो. तो ऐकतच नाही. जन्म तारीख माहीत आहे पण तो जन्मवेळ, ठिकाण काहीच सांगत नाही. म्हणतो विश्वास नाही. बघा तुम्हीच ठरवा काय ते.” माई

“मग केव्हा कळवता तुमचा निर्णय?” तिचे वडील

“कळवतो लवकरच. मीच बोलते त्याच्याशी एक दोन दिवसांत व कळवते. पण काय हो मुलीची इच्छा नव्हती का? अशी का आली ती काहीच तयारी न करता? गैरसमज होतो ना?” माई

“नाही नाही तसे काहीच नाही. तयार आहे ती लग्नाला.” तिचे वडील

“नाही हो! तिला आमची काळजी. ती म्हणते लग्न झालं तर भावांचं शिक्षण कसं होईल? आम्हाला पैशाचं पाठबळ नाही. म्हणून तिला दोन वर्ष तरी लग्न नको होतं.” सरिताची आई

“अहो मुलगा समजू आहे. सुधारक विचारांचा आहे. त्या दोघांना एकत्र असताना हे बोलायला हरकत नव्हती. पण असे वागलेले बरोबर नाही वाटले. मी तुमच्या ओळखीची तशी त्याच्याही. आता तो काय ठरवेल ते खरं. बघा तो समजूतदारपणे केव्हाच बाहेर गेला. मला तुमच्याशी बोलायला मिळावे म्हणून गेला असणार.” माई

“बघा लवकर कळवा, म्हणजे जीव टांगणीला नको.” तिचे वडील

“हो! हो! लवकरच कळवते. निघू?” माई

“हो! या हां! आणि तुम्ही येत जात रहा.” तिची आई.

**सुभाष-**

माई काय करताहेत येवढा वेळ? मुलीशी बोलत तर नसतील? पण बोलून काय उपयोग! असं कोणाला समजावून खोटी वचनं देऊन थोडंच लग्न करायचं? बघण्याचा प्रोग्रॅम व्यवस्थित झाला असता तरी मी ठरवलेच होते. मुलीची पूर्ण ओळख पटण्यासाठी एकदोनदा भेटू. मगच निर्णय घेऊ. पण आता तर काहीच करायला नको. मुलीचा निर्णय समजलाच आहे. हो, नाही सांगायचा प्रश्नच येत नाही.

पण एक समजत नाही यांनी मुलगी पहायला बोलावलेच का? तिची तयारी नव्हती तर कशाला खटाटोप करायचा? मुली पहाणं मला देखील पसंत नाही. माईनी जोर केला म्हणून आलो. असो.

एक समजत नाही, माझ्याच बाबतीत असं का होतं? आता मित्र विचारतील. काय सांगणार त्यांना? खास करून अव्या विचारत बसणार. अव्याची बहिण म्हणे माझ्यावर मरते. म्हणून तो नर्वस होता. पक्याकडे बोलला. कशाला मुली बघतोय? त्याची बहीण पसंत नाही काय? पण खरेच तिचा नखरेलपणा मला रुचत नव्हता. एकादी गोष्ट जरी रुचत नसेल तर का उगाच विचार करायचा? हा सरळ साधा मार्ग. पण मग ही मुली बघायची रीत तरी का अजमावायची? त्यांच्या स्वभावाची तर तोंड ओळख सुद्धा नसते. झालं विचार भरकटू लागलेत. नक्की काय निर्णय घ्यावा समजत नाही. मुलींशी मैत्री करायला जमत नाही. मग स्वभाव काय समजणार?

माई आल्या. माईंचा चेहरा अपराधी वाटतोय. चला समजेल काय ते..............

माई गप्पच आहेत. रिक्षा पकडली. घरी निघालोय. पांच मिनीटे झाली. तरी माई गप्पच? का? मीच विचारू का? नको उगाच, सांगतील त्याच. नाहीतर त्यांना वाटेल मला इंटरेस्ट आहे. उगीच गैरसमज नको.

**संवाद-**

“अरे तू गप्प का? काय म्हणणं आहे तुझं? कशी वाटली मुलगी?” माई

“माई, तुला तरी वाटलं का मुलगी लग्नाला तयार आहे? तुला नाही समजलं तिला लग्नात इंटरेस्ट नाही ते?” सुभाष

“हो रे बाबा! का अशी वागली समजलेच नाही.” माई

“अग माई तू मध्यस्थ ना? मग विचारले नाहीस? अशाने तुला ठपका येईल. दुसरा कुणी असता तर निघूनच गेला असता. तुझ्यासाठी थांबलो मी.” सुभाष.

“अरे! तेच तर विचारायला थांबले. म्हणतात कसे की भावांच्या शिक्षणासाठी एवढ्यात लग्नच नाही करायचे. मग हा प्रोग्रॅम तरी कशाला करायचा.” माई

“हे मोठ्यांचं चुकतं असं नाही वाटत माई? मुलीचा विचार न घेताच प्रोग्रॅम कशाला करायचा? आता त्यांचही मन खात राहाणारच ना? आपल्या कडून नकार जाणार हे समजलेच असेल त्यांना.” सुभाष.

“अरे मुलीकडचे आहेत ते. आशा लावून बसतात. मला लवकरात लवकर कळवा म्हणाले. काय ते तूच कळव बाबा. मी काय सांगायला धजणार नाही.” माई

“गप्पच बस दोन तीन दिवस. त्यांनाच समजून जाईल नकाराचे. त्यांनीही पाहिलंय काय घडलंय ते. चल तुझे घर आले माई. बरं भेटू नंतर.” सुभाष.

“बरं येते. आणि तू मनाला लावून घेवू नको. खूप जणी मिळतील तुला.” माई.

**सुभाष-**

माई खूपजणी मिळतील म्हणाल्या. आपण सुधारणार केव्हा! हेच करत राहायचं? मुली बघा नाकारा, दुसऱ्या बघा. नकारा. नंतर त्यांना काय वाटत असेल? इथे तर तिनेच नकार दाखवलाय. मलाच संकटातून वाचवलेय. आपण नकार कशाला कळवायचा? ती सांगेलच ना आई वडिलाना लग्न एवढ्यात नको म्हणून? मग मी कशाला दुखवू उगाच? फक्त स्वतःचा रुबाब, प्रतिष्ठा राखायला?

पण एवढं खरं मुलगी कंसीडरेट आहे. भावांच्या शिक्षणासाठी सॅक्रीफाईस करतेय. लग्नाची स्वप्न तिला असणारच. पण भावांचा, आई वडिलांचा विचार करून स्वतःच्या स्वप्नांना मुरड घालीत असेल. हे काय कमी आहे? या स्वार्थाने भरलेल्या समाजात हा नोबल विचार करणं व तसं वागणं हे काही सोपं नाही.

पण ती हे माझ्याशी बोलली असती तर? हा ड्रामा करायची काय जरूर होती? घरच्यानाही संकटात व आलेल्यांसमोर स्वतःची शोभा दुसरं काय. पण मी का एवढा विचार करतोय? मला मनात ठेच लागलीय म्हणून की मला एकंदरीत आवडलीय की काय? की न मिळणारी गोष्ट मिळावीच या ईर्षेने येताहेत हे विचार?

बापरे! हे विचार बंद केले पाहिजेत. या लग्नाचा विचारच सोडून दिला पाहिजे. जे आता शक्य नाही त्याच्यावर विचार कशाला.

विचार करायचा नाही ठरवून देखील विचार येत बसलेत. पिच्छाच सोडत नाहीत. ताणून देऊ. मग तरी विचार बंद होतील. पेईंग गेस्ट आहोत. सांगू जरा लवकर जेवायचे बघा म्हणून.

तिच्या घरी तिच्या वागण्यावर उहापोह झाला असणार. काय झाले असेल? आई वडील समजले असतील का तिला? भावांचे प्रेम समजले पाहिजे. तिचा सॅक्रीफाईस वाखाणतील की दोष देतील? ती सर्व काही कुटुंबाचाच विचार करून करतेय ना? तिला रागावणार तर नाहीत? भांडणार तर नाहीत? आणि ते देखील तिचीच वकिली करताहेत. मनासमोर बकऱ्या मोजायला सुरवात केली पाहिजे. मगच झोप येईल. पण हे विचार नकोत.

पेपर वाचताना नुसती नजर फिरतेय. काय वाचतोय तेच समजत नाही. लक्षच लागत नाही वांचण्यात. सारखी संध्याकाळ उभी रहातेय डोळ्यांसमोर. काहीच समजत नाही. अपमान वाटतोय? पहिल्यांदाच मनाविरूद्ध मुलगी पहायला गेलो त्याचं असं झालं म्हणून? की मुलीच्या मनात नक्की काय होते ते समजावे याचा आटापिटा? काय मन कशातच स्थिर होत नाही. केव्हा केव्हा एकांत सुद्धा हवासा वाटतो आणि नकोसा पण होतो. तसंच झालंय.

मित्रांकडे जावं तर उशीर झालाय. अव्या, सुऱ्या, मुंज्या कट्ट्यावर बसतात रात्री ११-११ वाजेपर्यंत. पण ते विचारत बसणार सगळंच. मग आणि ताप. सरळ वागताना सुद्धा असे ताप का मनाला? कोणतीही चूक नसताना सगळं सहन करायला येतं, का?

पक्या म्हणतो तेच खरं. खोल विचार करीत बसण्याचा स्वभाव करून ठेवलाय मी. चला दिवा मालवून झोपून देऊ.

**संवाद-**

“दादा, जेवायला चला, अरे झोपलात की काय?” घर मालकाचा मुलगा.

“नाही रे! जरा डोळे मिटून पडलो होतो.” सुभाष.

“चला, सगळे जेवायला आलेत. आणि बघा तुमचे डोळे केवढे लाल झालेत. बरं आहे ना?” घर मालकाचा मुलगा.

“बरं आहे रे, डोळे मिटून पडलो होतो ना, म्हणून झालेत लाल, निवळतील दोन मिनीटात.” सुभाष.

“या बसा! कसा काय झाला मुलगी पहाण्याचा प्रोग्रॅम? पसंत पडली की नाही?” घरमालकानी नको तोच विषय काढला.

“अहो! काय हे? बसूद्या की जेवायला. मग सावचितपणे सांगतीलच की. पण आल्यापासून मूड नाही एवढं दिसतंय.” कावळ्याची नजर असलेल्या मालकीणबाई मर्मावर घाव घालत बोलल्या.

“काही नाही, प्रोग्रॅम व्यवस्थित झाला. मुलगी ठरवेल काय ते. त्यांना पत्रिका पहायचीय. माझा विश्वास नाही. एवढा एकच तिढा आहे. तिथून येताना रिक्षांचा धूर असा काही नाकात शिरत होता की कंटाळायला, थकायला झाले म्हणून पडलो जरा.” तो समर्पक उत्तर शोधून देत होता.

“अहो द्या की पत्रिका. ऍरेंज्ड मॅरेजचे सोपस्कारच आहेत ते. आमचे लाडू चुकतात ना?” हाSS हाSS हंसत घरमालक बोलून गेले.

“आयुष्याचा जोडीदार निवडायचा. तुमच्या लाडवासाठी त्यांनी घाई करायची काय?” मालकीणबाई घरमालकाना समज देत बोलल्या.

**सुभाष-**

जेवण व उलट तपासणी संपलीय. आता जाऊ खोलीत व आराम करू. उद्यापासून उलट तपासण्यांची रांगच लागणार आहे. पण आयत्या वेळी काय समर्पक उत्तर सुचलं! हेच सांगायचं सगळ्याना. पटेल सगळ्याना.

काय झाले असेल तिच्या घरी? तिचे आई बाबा नक्कीच रागे भरले असणार. हे वागणे मलाच काय त्यांनाही अपमानास्पद वाटले असणार. काय विचार आहेत तिचे ते समजले असते तर मन जरा तरी स्थिर झाले असते.

देवाने मन जाणण्याची काहीच सोय केली नाही. केली असती तर?

**सरिता-**

आई बाबा फार बोलले. पण मी काय करू? मी कितीदा सांगीतले एवढ्यात लग्न करून दिलंत तर भावांचं शिक्षण कसं कराल? तुमचा खर्च कसा पुरा होईल? बाबा म्हणतात ते त्यांचं बघून घेतील. हे काय करणार आहेत पांचशे रुपये पगारांत? घर भाडे १२५ रूपये, सगळ्यांचे रेल्वेपास, दूध भजीपाला, रेशन, लाईट बिल या सगळ्यासाठी ६०० रुपयांच्या वर खर्च होतो. मग पाहुणे वगैरे आले की अजून लागतात. आई दर महिन्याला माझ्या पगारातून अडीचशे तीनशे घेतच असते. मग कसे होणार यांचे?

आई म्हणते मुलगा चांगला असला तर समजेल परिस्थिती. देईल तुझ्या पगारांतले दोन तीनशे रुपये. हा कसला विचार? आपली परिस्थिती दुसऱ्यासमोर कशी उघडी करायची? जरातरी मान नको का राखायला.

पण एक खरं! मुलगा शांत, विचारी वाटला. सुशिक्षीत आहे. बोलण्यात खूप चांगला आहे. मृदुभाषी म्हणतात ना तसाच. मी असं वागून चूक तर नाही केली? चांगला मुलगा जोडीदार मिळायला फार नशीब लागतं. याला दुखवून मी एक संधी तर नाही घालवली? जाऊ दे आता काय सुटलेला बाण परत येणार? काय नशिबांत आहे तेच होणार. पण कशावरून तो हो म्हणाला असता. एवढा शिकलेला बायको ग्रॅज्युएट तरी असावी म्हणणारच ना? आणि त्याचा नकार आला असता तर? माझा स्वभाव फार रागीट आहे. जळफळले असते त्याच्यावर. राग राग झाला असता. मला राग जराही आवरता येत नाही. मी दाखवत नाही पण मन रागाने असं काही तळमळतं की मी त्या माणसाशी बोलणंच सोडून देते.

महिमाच्या लग्नाच्या वेळी मी नको नको म्हणत असतानाही बाबांनी त्यांच्या अटी मान्य केल्या. जराही ताणून पाहिले नाही. मी बोलले तर फाडकन् म्हणाले गप्प रहा. तुला नाही समजत. मग फिरत होते सगळ्यांकडे पैसे मागत. माझा राग अनावर झाला होता. स्वतःच्या दुबळे पणाने ओढवून घेतलेल्या संकटाचा भुर्दंड लोकाना का?

सरळ सरळ विचारलेच त्यांना. त्या दिवसापासून बोलतो कुठे दोघेही. दीड वर्ष झालं आमचं बोलणं बंद होवून. इतकी मी रागीट. हा सरळ मृदू माणूस टिकेल माझ्यासमोर? नाही पण एक रागीट असलं तर दुसरं थंडच पाहिजे. चांगली जोडी झाली असती आपली.

आपल्याच मनचे मांडे! दुसरे काय! त्याने कुठे पसंती कळवलीय की दाखवलीय. आणि आता शक्यच वाटत नाही. आपण वागलोच तशा.

आई म्हणत होती, बाबा रात्रभर तळमळत होते. त्यांनी विचारलंय लग्नच करायचे नसेल तर तसे सांग म्हणालेत. कोणासमोर आणखी शोभा नको म्हणत होते. का नको लग्न करू? मला काय जन्मभर अशीच राहायचंय? दोन वर्ष नको म्हणतेय तर काय चुकलं? लग्न न करतां यांच्याच संसाराचा गाडा ओढत बसू? आणि भावांची लग्न झाली की कुठे जाऊ? मला काय जग माहीत नाही? देतील फेकून कचऱ्यात. गरज संपलेली असेल ना तेव्हा? मग कशाला विचारतील?

मग मी का विचार केला एवढा? का माझा स्वार्थ नाही बघीतला? चुकलेच माझे. लग्ना नंतर नोकरी करणारच होते की. मग माझे पैसे मी कुणाला द्यायचे ठरवू शकत होते. तो काय बोलला असता? बोलला असता तर सांगीतले असते आपली कमाई कशी खर्चायची तेही तुला विचारायचे का? गप्प झाला असता.

विचारांचं मोहळ काय शमत नाही. पाहू पुढे काय होतंय ते. आता जरा जरी आशा वाटली तर सोडायचं नाही. प्रयत्न करून पहायचा परत जमतं का. कशाला! माईनाच फोन करू की. पण माईंचा फोन तर डायरीत आहे. गपचुप लिहून घेवूया आणि ऑफिसमधून फोन करूया. पण बोलायचं काय? घरीच जाऊया का माईंच्या?

काल जाताना चेहरा रागावलेला नाही वाटला. विचारांत होता नक्की पण रागवला असं वाटत नाही. म्हणजे आशा आहे अजून. पण आता आपणच पुढे पडलो तर विचारेल की, कसली ऊपरती झाली आता. काय सांगायचे ठरवायला लागेल.

बापरे केवढे मनचे मांडे खातेय मी. यांतलं काहीतरी शक्य आहे का? रेल्वे पास घेतला, पर्समधे पैसे आहेत, माईंच्या फोनची चिठ्ठी टाकली. चला ऑफिसमधे जाऊन ठरवू. नाहीतर गाडी चुकेल.

**संवाद-**

“माई कशा आहांत?” सरिता.

“बरी आहे मी. काय ग फोन कसा केलास?” माई

“काही नाही. बाबा, आई जीव खाताहेत माझा. काही बोलले का ते? हो, नाही, काही म्हणाले?” सरिता.

“तो काय म्हणणार? अग तूच दाखवलीस लग्नाची नाराजी. तो काय निर्णय देणार? म्हणाला तिनेच निर्णय घेतलाय तर जबरदस्ती कसली. आपण कशाला हो, नाही, सांगायचे. बरोबरच आहे त्याचे.” माई

“माई काहीतरी गैरसमज होतोय. मला त्यांचा अपमान नव्हता करायचा. तुमच्याकडे फोन नंबर आहे का त्यांचा?” सरिता.

“कशाला ग आता? तो फार विचारी आहे. बोलणार नाही पण विचार करीत बसेल. जाऊ दे! दोन चार दिवसात सगळे विसरतील.” माई

“माई उगीचच गैरसमज नको. मला त्यांचा अपमान करायचा नव्हता एवढंच सांगायचंय. चुकून वाईट वाटलं असेल तर माफी मागेन. म्हणून हवाय फोन.” सरिता.

“बरं देते हा! पण ऑफिसचा आहे. तो पेईंगगेस्ट म्हणून रहातो ना. घरचा फोन देत नाही कुणाला. दुसऱ्याना त्रास नको म्हणतो. घे लिहून.” माई

“थँक्स माई! मी नक्की माफी मागेन म्हणजे तुम्हालाही दोष नको.” सरिता

**सरिता-**

चला फोन नंबर मिळाला. थोडा विचार करू मगच ठरवू केव्हा फोन करायचा. काय बोलायचे. माईंना सांगीतले तसेच सांगुया का? नको. ते अगदीच विषय संपवल्या सारखं वाटेल. आपल्याला तर दार उघडतं का बघायचंय. मग काहीतरी व्यवस्थित बोललं पाहिजे.

चला सुचेल काहीतरी. नाहीतरी सगळेच म्हणतात, जबरी बाई आहे म्हणून. कोणालाही गुंडाळते. म्हणूनच वाटतेय जास्त वेळ घालवता नये. लवकरच बोलायचे त्याच्याशी. पण रागावला असेल तर? आपल्याशी काहीच कर्तव्य नाही असे ठरवले असेल तर? अपमान वाटेलच की मला. पण मी सुद्धा केलाय ना अपमान? मग मलाही सहन करायला हवं. पण एकदा तरी बोललंच पाहिजे त्याच्याशी. नाहीतर मन खात राहील सारखे.

चार वाजलेत करूया फोन. लागलाय फोन. ही कोण मधे आलीय. फोन ऑपरेटर वाटते. सांगीतले तिला त्याचे नाव. येईल फोनवर आता. माझं नाव विचारत होती. कोणाचा फोन आहे म्हणून सांगू विचारत होती. सांगेल ती नाव मग सावध होणार तो.

हातातला फोन थरथरतोय. गळ्यातही कोरड पडलीय. बोलायला होईल ना? आवाज कापरा येता कामा नये. पण आता काय फोन लावून मोकळी झालेय

**संवाद-**

“हॅलो! बोला! ” सुभाष.

“ .... ” तोंडच बंद झालंय. शब्दच फुटत नाही. सरिता.

“हॅलो! बोला, काही काम होतं का? बोला निःसंकोच बोला. तुमचा नकार केव्हाच कळलाय. आता दुसरं काय बोलायचं आहे काय?” सुभाष.

“नाही! नाही! मी तुम्हाला नकार बिकार नाही दिला. मी कशाला देईन नकार! पण मला आई बाबांचा राग आला होता. मी दोन वर्ष लग्न नको म्हणत होते. वर्षा पूर्वीच मोठीचं लग्न झालं. त्यावेळी काका, आत्यां कडून घेतलेले पैसे अजून द्यायचे आहेत. मग कोणत्या जोरावर हे माझं लग्न ठरवताहेत याचाच राग होता. तुम्हाला माझं शिक्षण तरी माहीत आहे का? मी फक्त एस्. एस्. सी आहे. तुम्ही एवढे शिकलेले मला कसे पसंत कराल. असाही विचार आला. भाऊ शिकणारे. त्यांचे शिक्षण व्हावे म्हणून मी कॉलेजला गेले नाही. नोकरी पकडली. अजून काही परिस्थिती वेगळी नाही. कसे करणार लग्न? तुमचा अपमान करायसाठी नाही, पण आई बाबांनी माझे ऐकले नाही म्हणून तशी वागले. मला समजलेच नाही यात तुम्हाला वाईट वाटेल.....” सरिता,

“हॅलो! हॅलो! ” सुभाष.

"थांबाना, ऐका जरा. तर तुम्हाला दुखवायची जरा देखील इच्छा नव्हती. मला तुम्ही माफ करावं म्हणून फोन केलाय." सरिता धडाधड बोलत होती. मधेच तो हॅलो! हॅलो! करून थांबवायला बघत होता.

"हॅलो! हे पहा, मी ऐकले सगळे. पण हा ऑफिसचा फोन आहे. मी नाही स्पष्ट बोलू शकणार. आपण तुम्हाला अजून काही सांगायचे असल्यास बाहेर भेटू शकतो का? फोनवर नको. अर्थात तुम्हाला पाहिजे असेल तरच." सुभाष.

"अहो असं कसं भेटणार? आपलं काय लग्न ठरलंय थोडंच. कोणी पाहिलं तर नाही तो अर्थ लावत बसतील. तुम्ही आमच्या घरी याल का? नाहीतर माईंच्या घरी भेटू. मला तुमच्या तोंडून ऐकायचंय माफ केलं म्हणून." सरिता.

"ते काय मी आत्तांच फोनवर सांगतो, माफ केलं. झालं ना. पण खरंच मला राग नव्हता आला. तुम्ही अशा का वागलात त्याचं कुतुहल होतं हे खरं." सुभाष.

"म्हणजे तुम्ही भेटायचं नाकारताय? माईंच्या घरीपण?" सरिता

"पाहू, माईना विचारा. त्या माझ्याशी बोलल्या तर पाहू. बरं चला ठेवू फोन? ऑफिस आहे हे. कामं चालू आहेत." सुभाष.

"बरं! " सरिता.

**सुभाष-**

हा फोन कसा काय आला? तिचा स्वतःचाच विचार दिसतोय. घरच्यानी करायला सांगीतलेले दिसत नाही. आवाज, बोलणे यावरून तिनेच स्वतः केलेला दिसतोय. फोन नंबर कुठून मिळवलान? तिला काहीतरी अजून बोलायचे होते असे वाटले. संभाषण ओपन रहावे अशी तऱ्हा होती बोलण्याची. आणि घरी कशी काय बोलवतेय? तिथे तर सगळेच असणार. कसे बोलता येईल. माईंकडे पण तेच. मग उपयोग काय जाण्याचा? बाहेर भेटायला नाही म्हणते. बरोबर आहे. अजून लोक तेवढे सुधारले नाहीत. पाहिलं तर बडबडतात. मुलीनाच जास्त दोष मिळतो.

पण नक्की काय असेल तिच्या मनात? जरा कुठे आज मन निवळत होते तो हा फोन. परत विचार चक्र सुरू. मुलगी हा ही एक ग्रह असतो वाटते पत्रिकेत. तो माझ्या वक्री पडलाय सध्या. पत्रिका! पत्रिके वरून आठवले. परत पत्रिका तर मागणार नाहीत? त्यासाठी तर हा फोन नाही ना? पण एवढ्यात लग्न नको तर हा उपद्व्याप का मांडलाय हिने? जाऊ दे! ही मुलगी पहायची रीत मला तरी तापदायक झालीय. लवकरच बाहेर पडले पाहिजे या विचार चक्रातून.

तिच्या माफी मागण्यात मात्र खरेपणा जाणवला. कदाचित अर्धवटपणाने, आई बाबाना शिकवायसाठी वागली असेल ती. पण येणाऱ्या लोकावर काय परीणाम होईल याचा विचार तर हवा. खरं असेल लग्नासाठी वडलाना देणं झालं असेल, पण मी देखील तसंच मागेन हे कसं गृहीत धरलंन. मी तर काही घेण्याच्या विरुद्ध आहे. उलट नोकरी करणारी मुलगी असली तर तिच्या व आपल्या सेविंग मधून जमेल तसं साधंच लग्न करावं या विचाराचा. माझे विचार न जाणताच ही गृहीत धरून बसली. मी देखील लोचट हुंडा मागणारा असेन. यांत तिचा दोष नाही म्हणा, समाजात हेच प्रचलीत आहे. फुकटचं मिळेल ते पदरांत पाडायचं.

माझं मन असं विचित्र का विचार करतंय एकदा तिला दोष देतंय, मग तिचीच वकिली करतंय? काय झालंय काय मनाला. ती आवडलीय की काय? पण नक्की सांगताही येणार नाही. अगोदर आपल्यावरच विचार केला पाहिजे. आपण ठरवलेल्या निकषांवर ती उतरते की नाही हे नको बघायला? फक्त मिळत नाही ते मिळवलेच पाहिजे हा बालीशपणा इथे कसा चालेल? आयुष्याचा प्रश्न आहे.

चला ऑफिसमधले लोक निघाले. घरी जाऊ. मग मित्रांत जाऊन वेळ काढू. एकटाच राहीलो तर विचार सतवणार.

**संवाद-**

“कुठे लक्ष आहे तुझे. कसल्या गहन विचारात पडलायस. आम्ही आहोत इथे. काय विचारतोय ते ऐकू नाही आलं?” पक्या

“हं! काय झालं? काय विचारतोयस?” सुभाष.

“झालं! गेला रे! फुकट गेला! कामातून गेला! आपल्याकडे लक्षच नाही याचं.” पक्या

“पोरगी ठसली काय रे मनात एवढी? की आता आमच्याशी बोलायला करमत नाही?” अव्या.

“नाही रे, जरा ऑफिसची गडबड आहे. उद्या जरा एक काम पुरे करायचेय त्याचा विचार करत होतो” सुभाष.

“फेकू नको! एवढे अज्ञानी नाही. आम्ही पण पोरी बघतोय. दोन वर्ष झाली. तू तर पहिलीच पाहिलीस. एवढा गुरफटलास? बघ अजून विचार कर. माझी बहीण जीव लावून बसलीय रे तुझ्यावर. मी जरा जरी तुझ्याबद्दल वाईट बोललो तर बोलणं सोडून देते माझ्याबरोबर. अशी जीव लावणारी मिळाली ना तरच सुखी होतो माणूस.” अव्या

“ए थांब रे अव्या. पहिले त्याला सांगू देत ना काल काय झालं ते. बोल रे! ” पक्या

“काय होणार! मुलीला दोन वर्षे लग्नच करायचं नाही.” सुभाष.

“मग काय तुला चहा पाण्याला बोलावले? आणि तू विचारात, म्हणजे तुला आवडलीय. पण लग्न दोन वर्षांनी. च्यायला ठरवून टाक दोन वर्ष पिक्चर बघ, फिरायला जा.” पक्या

“अरे नाही रे बाबानो! मी तिचा किंवा कालचा विचार नाही करीत. मी तर परत मुलगी पहायला जायचं की नाही, याच्यावर विचार करतोय.” सुभाष.

“झालं! आमच्या सद्गुणी, विचारी दोस्ताचा मुडदाच पाडलाय तिने. लिहून देतो मी, हा याच मुलीशी लग्न करणार. करणार तो करणार, पण ती याच्यावर राज्य करणार.” अव्या

“अव्या फुकट चिडवू नकोस त्याला. तुझ्या बहिणीशी करायला नाही म्हणतो, म्हणून काय वाटेल ते बोलतोस?” पक्या

“बेट लगाता है? मेरा कहा भविष्य पक्का है. सच होगा तो पक्या तूने मै कहूं वो करनेका. मेरी गुलामी भी.” अव्या हिंदीवर उतरला म्हणजे पेटत चालला होता.

“अरे कसल्या बेट लावताय? आणि भांडता कशाला माझ्यावरून? दुसरा विषय नाही काय तुम्हाला?” सुभाष.

“काय रे बटाट्यांचा भाव काय रे आज” अव्या

“अव्या पुरे हां आता. नाहीतर मी जातो. म्हणजे विषयच बंद होईल” सुभाष.

“अरे मग सविस्तर सांग ना काय झालं ते? तुझं कारण काय पटत नाही.” पक्या

"बघा! तिच्या आई बाबाना तिचे लग्न करायचेय. पण भाऊ लहान शिकतायत. वडलांचा पगार कमी त्यात भागणार कसे? लग्नाचाही खर्च झेपणार कसा, परत मोठ्या बहिणीच्या लग्नात झालेलं देणं अजून बाकी, म्हणून तिला दोन वर्ष लग्न नको. पण आईबाबांनी परस्पर प्रोग्रॅम ठरवला. तो तिला नाही आवडला. मग काय तिने मनावरच घेतले नाही. घरच्याच कपड्यात चहापाणी करायला आली. म्हणजे तिचा लग्नाला नकारच नाही का? प्रश्न संपला. त्याच्यावर चर्चा करण्यासारखे आहे का काही?" सुभाष.

दोन मिनीटे शांततेत गेली.

"तू नापसंत तर नव्हतास ना तिला?" पक्या

"काय नापसंत करेल? तिच्या कितीतरी पटीने हा सरस आहे. मला वाटतं याला हीच मुलगी योग्य आहे. चांगली सांभाळील याला. काय पण कर रे, तू हिच्याशीच लग्न कर. खुशीत संसार होईल तिचा. सगळं तुझं व्यवस्थित चालवेल ती. तुझ्या सारख्या मवाळ माणसाला अशीच खमकी पाहिजे. मी सांगतो बघ तुझं हिच्याशीच लग्न होणार." अव्या

"मग, तुझ्या बहिणीचा विचार सोडायचा काय?" पक्याने हंसत विचारले.

"अरे, तो विचार करायलाही तयार नाय. त्याच्यावर काय जबरदस्ती करणार? पडू दे खडड्यांत आपल्याला काय! चला मी चलतो घरी. उशीर झालाय." अव्या

**सुभाष-**

चला, आपण पण निघू. दुसरी तपासणी संपली. आता गप्प राहिले की हळू हळू विषय बंद होईल. पण अव्याने कशावरून ठरवले की हिच्याशीच लग्न होणार? माझ्या बोलण्यातून तिची वकिली तर नाही झाली? नाही वाटत तसे. मग त्याच्या बहिणीचा मी विचार करीत नाही म्हणून तर नाहीना बोलत तो? चला सोडून देऊ. कशाला विचार करीत बसायचे?

........

........

दोन दिवस झाले. ऑफिसमधे फोन वाजला की का वाटते तिचा असावा म्हणून. मन काय खेळ करतेय? थांबवले पाहिजे हे. माईंचाही फोन नाही. त्यांना भेटली नाही काय ती. माईंकडे फोनवर बोलली असती तरी माईंनी फोन केला असता. पण माईंकडे आपण स्वच्छ शब्दात बोलून बसलोय. त्यांनी परस्पर तिला सांगून टाकले असेल तर? मग विषयच संपला. अरे पण आपल्याला विषय संपवायचा होता ना? मग आता रुखरुख का मनाला.

अव्या म्हणत होता, हीच बरोबर सांभाळील. मी काय लंगडा लुळा आहे सांभाळायला. शांत आहे एवढंच. पण हेही खरं, या जगात एकात तरी खमकेपणा पण हवा.

काय चाललंय मनात? प्रत्येक प्रश्नाचं उत्तर तिची वकिली का करतंय? सगळं तिच्या बाजूनेच का जातंय? मनात भरली की काय? जाऊ दे जास्त विचार नको.

**सरिता-**

तीन चार दिवस झाले. माईंशी फोनवर बोलले होते. त्यांची माफी देखील मागीतली. एकदा त्यांच्या घरी भेटायला होईल का विचारले तर म्हणाल्या "कशाला? तो काय दोन वर्ष थांबणार नाही. त्याला फार काही इंटरेस्ट नाही आता. तुलाच नको ना लग्न? मग कशाला परत भेटणार?"

फार काही बोलले नाही. पण सांगीतले फोन केल्याचे, त्यांच्या घरी भेटण्याचे ठरवतोय म्हणून. तर आश्चर्यांत पडल्या. मग म्हणाल्या पाहीन विचारून. तो तयार असेल तर माझी हरकत नाही. तरी देखील अजून फोन नाही. काय झाले असेल? पण मी तरी का एवढी मागे लागतेय? मलाच नको होते ना लग्न एवढ्यात? मग आता का मागे पडते आहे? तसे बघीतले तर मनात संशयही आहे त्याच्या बद्दल. एवढे शिकलेला मला का पसंत करेल? काहीतरी भानगड नाही ना? तरी देखील मीच का पाठपुरावा करतेय?अरे हा कसला विचार? मी संशयी केव्हापासून व्हायला लागले? नको तो संशय मनात शिरतोय.

नको ती वाट पहाणं. करू का माईना फोन? की त्यालाच करू? पण हात फोन कडेच थांबतात. नकारघंटा वाजली तर सगळंच बंद मग फार चुकचुक लागेल जीवाला. थांबू अजून. नाहीतर माईना गांठू. योगायोगाने भेटलो असे नाटक करू. व मग विचारू. पण कसे साधायचे हे सर्व? माई रहातात तिकडे दुसरे कोणीच ओळखीचे नाहीत. काय करायचे?

.......

.......

आता आठ दिवस व्हायला आले. माझ्या हातून सगळे निसटतेय वाटते. माई दररोज संध्याकाळी देवळात  जातात म्हणे. तिथेच लवकर जाऊन बसायचे. माई येईपर्यंत वाट बघायची. मग सरळ त्यांना गाठून बोलायचे. त्यासाठी ऑफिस मधून अर्धा दिवस रजा काढायची. नक्की ठरले व मन जरा शांत झाले. दुसऱ्याच दिवशी रजा घेतली.

पाच वाजल्यापासून बसलीय देवळात येतील ना माई? वाट बघून बघून ताण वाढलाय. दिसता नये तोंडावर.

ओ! हो! माई येतायत. फुलांची पुडी घेऊन लाईन लाऊया. देवाला वाहून मगच माईना भेटू. अगदी सहज भेटल्यासारखे.

**संवाद-**

"अरे! माई तुम्ही! " सरिता.

"तू इकडे कुठे? आणि आज रजा होती का?" माई

"नाही. पण एकाने सांगीतले महिन्यातून १ दिवस, असे ११ दिवस दत्तमहाराजाना फुले वहा. म्हणून आले. पण माई तुम्ही कळवलंत त्यांना?" सरिता.

"नाही ग, राहूनच गेलं. त्याला ऑफिसमधे फोन करायला लागतो ना. तेव्हा माझी कामे असतात. राहून गेले उद्याच करते हा. पण भेटशील तेव्हा मागच्यासारखे काही करणार नाहीस ना? उगीच त्याचा परत अपमान नको." माई.

"माई मी फक्त माफी मागणार. माझी अडचण समजावणार. गैरसमज दूर करायचा प्रयत्न करणार. मगच मन शांत होईल. माझ्या वागण्याने त्यांचा अपमान झालाय ते डाचतंय हो मनात. ती डाच तरी बंद होईल?" सरिता.

"बरं! बरं! करते हो उद्याच फोन. कळवते तुला उद्या रात्री काय म्हणाला ते." निघता निघता माई सांगत होत्या.

**सरिता-**

घरी तरंगतच चाललेय. मस्त जमवून आणल्याचा आनंद झाला होता. पण मनात हुरहुर देखील होती. ते नाही म्हणणार नाहीत ना? पण लग्न करायची तयारी नव्हती आता एकदम असं का वाटतंय? भावांचं काय? आई बाबांचं कसं होईल? हे सगळे विचार मागे कसे पडले? एवढी धडपड का करतेय मी? तयारी दाखवली तर ते नाही का विचारणार? सगळे प्रश्न कसे सोडवलेत इतक्या लवकर? काय सांगणार मग?

एक मिळालं त्याचा आनंद दुसरी भीती पळवून लावते. आनंद वाट्यालाच येत नाही. सगळी दडपणं मनावर! दुसरं काय! आता जायला तर पाहिजेच पण बोलणार काय? माफी मागून झालीय. त्यांनीय माफ केलेय म्हणाले. मग बोलायचं काय राहिलंय आता?

पण माईंचा फोन तर येऊ देत भेटायचे ठरले तरच हे प्रश्न येतात. नाहीतर निकालच लागणार. हो म्हणाले तर मात्र जोरात घोडे दामटायचे. काहीतरी विचार करून ठेवायलाच हवा.

**संवाद-**

“हां बोला माई. कसा काय फोन केलात?” सुभाष.

“अरे, मला भेटली होती. पहिले फोन आला होता. तिला आता पश्चाताप होतो की काय माहीत नाही. पण तुला आमच्या घरी भेटायचं म्हणतेय. तू काय म्हणतोस?” माई

“हो माई, मलाही फोन आला होता. माफी मागत होती. मी माफी मान्यही केली. राग नाही हे देखील सांगीतलं. मग भेटायचे कशाबद्दल? तुम्हाला काय वाटते माई? भेटणे प्रशस्त आहे? तुमचा अनुभव जास्त ठरवू शकतो.” सुभाष.

“बघ रे बाबा, होतात अशा गडबडी मुलींकडून. बावरलेल्या असतात त्या. बघ काय म्हणते ती. नाहीतरी प्रत्यक्ष तुझे आणि तिचे बोलणे नाहीच झालेय. मला माहीत आहे ती शिकली नाही, पण हुशार आहे. संसाराला चांगली आहे. चांगल्या घरची आहे. आणि तू विचार की, तिला असं वागू नये हे आता लक्षांत आलंय. तिला काय वाटतं ते बघ. मगच शांतपणे ठरव. जोडीदार म्हणून चालेल की नाही ते.” माई.

“बरंय माई, थोडा विचार करतो आणि कळवतो उद्या नाहीतर सोमवारी.” सुभाष.

“अरे कशाला लांबण लावतोस? परवा रविवार आहे ये दुपारी चार नंतर. आटपून टाक. म्हणजे दोघांचाही जीव टांगणीला लागून रहाणार नाही. पुढच्या रविवारी मी नाही. जरा बाहेर जाणार आहे.” माई

“असं म्हणतां, बरं ठीक येतो दुपारी चार सव्वाचारपर्यंत.” सुभाष.

“बरं कळवते मी तिला. पण तू पड खाऊन बळी पडू नकोस हा. शांतपणे विचार करून मगच निर्णय घे.” माई

**सुभाष-**

काय म्हणून माईंना हो म्हणालो? हे सगळं अव्याच्या म्हणण्याप्रमाणे तर होत नाही? आपण हो म्हणून चूक तर नाही केली. काय बोलणार तिथे? परत शोभा तर करून नाही ना घेणार?

पण ती काय बोलणार असेल? शिकली नाही कारण परिस्थिती. हुशारी शिक्षणानेच येते असे नाही. त्याशिवाय देखील अनुभवाने खूप काही जाणता येते. त्यातलीच नसेल ना ही? बघू, कशी आहे ते समजण्याचा योग आलाय. बाकीचे पुढचे पुढे.

**सरिता-**

माईंचा फोन आला. रविवारी भेटायचं. साडेचारला ये म्हणाल्यात. बापरे! आयत्या वेळी गळाठणार नाही ना मी? आत्ताच पाय थरथरायला लागलेत. एकच दिवस आहे मधे. विचार केलाच पाहिजे मलाच बोलावं लागणार. मीच बोलावलंय भेटायला. आता माघारही घेता येणार नाही.

काय बोलायचं?

...........

...........

रविवार जाता जात नाही. आता कुठे दोनच वाजताहेत. सगळे झोपलेत. रविवारी दुपारी सगळेच झोपतात, मी देखील. पण आज डोळेच उघडे रहातायत. चिक्कार विचार येतात जातात. पण कुठलाही ठामपणे पक्का होत नाही. काय बोलणार आहे ते देवालाच ठाऊक. पण मी जबाबदार आहे याला. मीच भेटीचा घाट घातलाय. फसून गेलेय. बोलायचं काय हे सुचत नाही. पण जाण्याची ओढ मात्र वाढतेच आहे. कसली अवस्था आहे ही?

आईला बोललेय, चार वाजतां माईना भेटून येतेय. गप्पच बसली. तिच्या डोळ्यांतही राग दिसला. नाहीतरी त्या दिवसापासून फार मोजकेच बोलतेय ती, कामापुरतेच. बाबांनी तर बोलणंच सोडलंय. सगळ्याला जबाबदार मीच.

बघू किती वाजले. बस्स् अडीच. काटे धावत का नाहीत आज?

**सुभाष-**

चार वाजता पोहोचायचं, तयार होवूया. काय सांगणार आहे देव जाणे. शांतपणे ऐकून घेऊ. हुशारी अजमावू. सरळ सांगू. पूर्ण स्वभाव समजल्याशिवाय निर्णय देता येणार नाही. त्यासाठी सहवास लागेल. भेटावे लागेल. तयार झाली तर ठीक.

पण तिने तर अगोदरच सांगीतलं आहे. लग्न ठरल्या शिवाय बाहेर भेटणं प्रशस्त नाही. मग मानेल कशी? जे होईल ते पाहू. जाऊ तर खरे.



**संवाद-**

“आलास! ये! बस. तिला सांगीतलेय मी साडेचारला ये म्हणून. येईलच इतक्यांत....अरे! बेल वाजलीच आली वाटते.......वा! ये! ये! बरोबर तर नाही आलांत ना तुम्ही? मला दाखवायसाठी मागे पुढे झालांत काय ग? ” माई हंसत बोलल्या.

“म्हणजे?” सरिता आतल्या खोलीत जाता जाता बोलली.

“अग, लगोलग मागेच आलीस तू त्याच्या. तो बसला पण नाही, एवढ्यात बेल वाजली. म्हणून वाटले बरोबर आलात की काय.” माई

“माई, तुमच्यासाठी काय आणलंय बघा. आत या.” सरिता

“असू दे! ठेव ते! पहिली बाहेर ये.” माई.

“अहो आत या. याचं काय करायचं ते सांगा. मग जाऊच की बाहेर” सरिता.

“काय आणलंयस हे? वा जय्यत तयारी करून आलीस फराळाची. बरं चल बाहेर. मग घेऊ फराळ.” माई.

“मग, कशासाठी भेटायचं ठरवलंस ग? लग्नाचा विचार बदललास का?” माई बाहेर जाता जाता बोलल्या.

“अगदी तसंच नाही. पण दुसऱ्यांचे विचार जाणून घेणं हे देखील बरं असतं, असं वाटलं. आपलाच हट्ट का करायचा माई? मला आत्ता लग्न का करणं शक्य नाही ते मी माझ्या मते ठरवले. पण त्यांचे विचार जाणून नाही घेतले. उलट माझ्या वागणूकीने दुखावले मी सगळयाना. तसं नको होतं व्हायला.” तिच्या बोलण्यात कापरेपणा असला तरी स्वच्छ विचार दिसत होते.

“बघ रे बाबा, तुझा विचार जाणून घ्यायचाय तिला.” माई.

“कशाबद्दल? मी आधीच सांगीतले माझा काहीच राग नाही. फक्त कुतूहल होते. एकादी मुलगी अशी का वागावी याचे. आता तेही समजले. त्यांचा ठाम निर्णय आहे. दोन वर्षे लग्न नाही. मग मी काय सांगणार?” सुभाष.

“प्रत्येक मुलीला लग्न, संसार, स्वतःचं घर याची ओढ असतेच. पण घरच्या परिस्थिती मुळे काही मुरड घालावी लागते. याचा अर्थ लग्न नको असा होत नाही. मला एकच जाणायचंय. लग्न झाल्यावर मी नोकरी करायची की नाही? नाही! त्यांना चांगला पगार आहे. कदाचित विचार असेल बायकोने कशाला नोकरी करायची! ” सरिता.

“माझे तसे काहीच नाही. तो प्रत्येकाचा स्वतःचा निर्णय असतो. तेवढं स्वातंत्र्य देण्यांत मी मानतो. पण मला जेवणातले काही जमत नाही. ते कसे सांभाळायचे?” सुभाष.

“फक्त एकच प्रश्न उरतो. माझ्या पगारातून मी माहेरी मदत केली तर चालू शकते का?” सरिता.

“आपण कमवलेले पैसे कसे खर्चावेत हे आपणच ठरवायचं असतं. त्यात ढवळाढवळ करण्याचा प्रश्नच येत नाही.” सुभाष.

“मग लग्न काय होऊ शकतं. आत्ताही. दोन वर्ष थांबायचं कारण नाही.” सरिता.

.............

.............

"पण मला विचार करायला वेळ हवा. स्वभावही समजून घ्यायला हवेत. त्यासाठी थोडाफार सहवास व इतर गोष्टी माहीत व्हायला पाहिजे." तो थोड्या शांतते नंतर बोलला.

"इतर गोष्टी मीच सांगते. जेवण करता येते की नाही, गाता येते का, चालून दाखवा, वगैरे जाणायचे असेल तर, चालणे पाहिलेतच, बोलतो तर आहोतच, मी गाणं शिकलेच नाही, गायचा कधी प्रयत्न केला नाही. जेवण सर्व करता येते. माई, मी गाजर संत्र्याचा हलवा करून आणलाय आपण घेऊया का? म्हणजे त्याबाबतही शंका रहाणार नाही. घरी जेवायला आले तर पुरणपोळ्यांचा बेत करू. राहिले ते स्वभाव जाणण्यासाठी सहवासाचे. माईंकडे किंवा आमच्या घरी भेटू शकतो. बाहेर भेटणे मलाच आवडत नाही. त्या बाबत मी सुधारलेली नाही हे खरे." सरिता.

"बघ रे बाबा, ती सगळंच उघड बोलतेय. तुला बोलायला काही जागाच ठेवली नाही तिने." हंसत माई बोलल्या.

"तरी देखील माई एक दोन दिवस मला विचार करायला पाहिजेत." सुभाष.

"माई चहा, साखर दाखवा. मी चहा करते. कुणाला कॉफी पाहिजे का? ती देखील करते." सरिता.

"बरं बाई तूच कर. बघ समोरच आहेत चहासाखरेचे डबे. काय रे तू चहा घेणार की कॉफी?" माई.

"चहाच चालेल." सुभाष.

.......

.......

“चांगलाच लागतो ग गाजर संत्र्याचा हलवा. कधी ऐकला नव्हता असा हलवा. वा छान आहे. काय रे तुला कसा वाटला?” माई

“छानच आहे. मी देखील पहिल्यांदाच ऐकला व खातोय..” सुभाष.

“बरीच तयारी करून आलीय रे ही. बहुतेक तिचा निर्णय बदललाय. आता तुलाच उत्तर द्यायला लागणार. बघ काय ते.” माई

“नाही. त्यांना विचार करू दे. मगच ठरवू दे. त्यांनी बघितल्या असतील ना इतरही मुली. ठरवू दे त्यांना.” सरिता.

.......

.......

“चला माई, मी निघतो.” सुभाष.

“बरं, ये पण लवकरच कळव. ती नाही म्हणाली तरी जीव टांगणीला असतो रे.” माई.

“हो” सुभाष.

.......

.......

“जबरी धीराची गो तू! कवढे बडबडलीस. पहिला चांगला घोळ केलास, मग निघालीस निस्तरायला. पण काही म्हण तो शांत, विचारी आहे मोजकेच बोलतो.” माई

“माई मला काळजी आईबाबांची. थोड्या दिवसानी सांगा त्यांना तुमच्या घरी भेटल्याचे. म्हणजे राग तरी कमी होईल. मी निघते पाच दहा मिनीटांत.” सरिता.

**सरिता-**

चांगलंच बोलले, खरंच कसं सुचलं एवढं? पहिल्यांदा काहीच ठरवता येत नव्हतं. सुचलं तर पूर आल्यासारखं धो धो बोलत सुटले. काय म्हणतील ते. जबरी म्हणतील, माईसारखं? पण एवढं खरं अगदी कमी बोलणारे दिसतात. तसं मी कमीच बोलते. पण आजचा दिवस काहीतरी निराळाच होता. कसं सगळं बोलायला झालं देवालाच ठाऊक. काय देवाच्या मनात आहे तोच जाणे. नाही तरी लग्नाच्या गाठी तोच बांधतो म्हणतात. बघू काय कळवतात ते.

एक खरं, दार उघडलं तर खरं. आता तेच काय ते ठरवतील. आणि नाही म्हणाले तर? तर जळफळाट होईल की आपला. मी रागीट आहे. मला मनाविरुद्ध काही सहनच होत नाही. मग राग राग होतो. त्यांना हे माहीत नाही. समजता कामा नये. परत भेटलेच तर संभाळून वागलं पाहिजे. कुणावरही राग करायचा नाही.

आज आनंदात आहे. माझे प्रयत्न सफळ झाले. परत ‘हो, ना,’ वर तर आणलं त्यांना. बघू पुढे काय होतं ते.

**सुभाष-**

बरंच काही बोलली. जरा जास्तच स्पष्ट होती. स्वभाव सरळ स्पष्टवक्ता आहे की आढ्यता आहे. आपलं तेच बरोबर करणारी तर नाही. पण तसं का म्हणू? तिचं बरोबरच आहे. लग्ना नंतर आई बाबाना पैसे द्यायला मिळाले तर तिचे प्रश्न सुटतात. मग लग्न करायला काय हरकत. खरं आहे. हे सरळ बोलणं झालं.

काय तर म्हणे गाजर-संत्र्याचा हलवा, पण मस्त लागला. आंबट गोड. छानच होता. हातात जेवणाची कला दिसतेय. घाबरट वाटली नाही. माईंच्या घरी आली तरी मला बघून बावरली नाही. सरळ आत गेली. माईना त्रास नको म्हणून खायचे करूनच आणले. समजूतदार दिसते.

तशी टापटीपीत रहाणारी वाटली. प्रसन्न होती. सर्वांत म्हणजे शिकली नसली तरी चलाख आहे, हुशार आहे. कदाचित शिकलेल्यांकडे देखील अशी हुशारी मिळताना कठीण. तशी करारी पण दिसते. आपल्या शांत स्वभावाला जमेल? की अव्या म्हणतो तसं. तीच राज्य करेल?

पण आज जरा मन मोकळं झाल्यासारखं वाटतंय. असं का? मनावरचा दाब गेला. बरं झालं.

आत्तां तर सहाच वाजताहेत. घरी जाऊन काय करणार? जाऊया का मित्रांत? पण सावध राहिलं पाहिजे. काय चुकून बोललो तर चांगलेच सतवतील.

पण वेळ तरी कसा घालवयचा? चला जाऊ थोडा वेळ.

**संवाद-**

“आलास काय रे? लेट आलास! पोरगी बघायला गेला होतास का दुसरी?” अव्या.

“दररोज काय पोरी सांगून येतात का रे? उगीच उडवत असतोस सगळ्यांची” सुभाष

“अरे हमने तो सुबे एक शामको एक ऐसे देखी है.” अव्या

“और दोनेने एकही साथ इसे ना बोला. मालूम है? वो छुपाता है.” पक्या

“पक्या काय तरी फेकू नको. मीच सगळ्याना नाकारलंय. फेकतो उगाच.” अव्या

“मग त्या राजकुमार सारखी हिंदीतून ऐट मारायची सोड. सरळ बोलत जा.” पक्या

“अरे काय भांडताय, जरा सरळ बोला ना.” सुभाष

“वा! बोला साधु बोला! तुमची गोष्ट कुठवर पोचली? फोनबीन आला की नाही? पुढे गाडी सरकायलाच हवी एवढ्यात . नाहीतर माझे भविष्य खोटे ठरेल ना? बोला.” अव्या

“काय छळतोयस रे तू त्याला? त्याला कशाला फोन येईल आता?” पक्या

“बघ पक्या, एकादी पोरगी पहिल्यांदा नाही म्हणते. मग चूक उमगली की सुधारायचा अटोकाट प्रयत्न करते. हुशार असतात पोरी. बघ याला फोन येईलच. नाहीतर भेटायलाही येईल. उगीच

नाही सांगत पुरा अनुभव आहे. दहा मुली बघून झाल्यात. अजून चालूच आहे. काय रे पण आज रविवार. तू झोपल्या सारखा दिसत नाहीस. आत्तांच आलास. काय आजच अपॉईंटमेंट तर झाली नाही?” अव्या

“अव्या, एवढ्या मुली नाकारतोस. तू काय लागून गेलास रे? लाज देखील वाटत नाही एवढ्या मुली बघितल्या म्हणून सांगायला? आणि दुसऱ्यांवर ताशेरे मारतोस?” सुभाष

“कोई हमारे बहेन को भी ना बोला है. गुस्सा है हमारा. इसलिये ना बोलते है सबको.” अव्या

“पक्या, चल मी निघतो. याच्याबरोबर काय बोलणार?” सुभाष.

“बरं! ये रे. पण तिचा फोन आला किंवा भेटली तर जरूर सांग. मोलाचा सल्ला देईन. आयुष्यभर आठवणीत ठेवशील.” अव्या

“असं म्हणतोस! मग ऐक समज भेटली ती मला आज. खायला करून आणलं तिने. माफी मागीतली माझी. व म्हणाली लग्न करायचंय. काय सांगशील मग मला?” सुभाष

“असं झालंय की समजायचंच फक्त? पण असं झालं तर जा, करून टाक लग्न तिच्याशी. तीच सांभाळेल तुला. हमारा कहा है ये. काळ्या दगडावरची रेघ.” अव्या

“चल, चल अव्या, खूप मारलीस हुषारी.” पक्या

“पक्या, तेरी मेरी बेट तो है ही. ये शादी होगी तो तू मेरा गुलाम! याद रखना.” अव्या

**सुभाष-**

रागाने निघालो खरा पण मनात एक सारखं येत होतं, हा अव्या मनकवडा तर नाही. याला कसं समजतं सगळं? खरंच खूप मुली बघून अनुभव गोळा केलान की काय? पण बोलतो ते जणू काय त्याच्या समोरच घडल्या सारखं.

पण ती माईंकडे कशी उत्साहात होती, प्रसन्न होती. सुंदर तर आहे, पण चेहेरा जास्त बोलका आहे. राग त्या दिवशी तिच्या घरी बघीतला. चेहेऱ्यावर ओसंडून वहात होता. आज आनंदाने फुललेली बघितली. हलवा चांगला झालाय म्हटल्यावरची प्रतिक्रिया तर समाधान, आनंद व एक खट्याळ हसू पण चेहेऱ्यावर उमटवून गेलं. अशी माणसं अगदी सहज वाचता येतात. राग लोभ, घृणा, माया, प्रेम सगळं कसं चेहेरा सांगून जातो.

अरे! हो! हो! हे मन तर सगळे गुणच गुण गात चाललंय. अजून काही स्वभाव समजायला नको का! हे भरधाव सुटलंय. अव्या जिंकणार कीं काय?

माईनी नुसती बघ्याची भूमिका घेतली होती. काहीच मत दाखवीत नव्हत्या. तिच्या बोलण्यात मजेदार खोंचकपणा दिसला. मुलगी पहायच्या प्रथेवर कशी हळूच टिपणी करून टाकलीन. चालते कशी ते पाहिलेत, बोलणंही पाहिलंत, गाता येत नाही, पाकशास्त्रात गती म्हणून पुरावा आणला, गाजरसंत्र्याच्या हलव्याचा, वर आमंत्रण दिले पुरणपोळीच्या जेवणाचे. फार हळूवारपणाने प्रथेचे व्यंग उलगडताना काळजीही घेतली, लागट वाटणार नाही याची. हुषार म्हणायचे नाहीतर काय!

मग सांगणार आहेस का पसंती? नाहीतरी माई म्हणाल्याच आहेत, जीव टांगणीला नको म्हणून. उत्तरही मलाच द्यायचं आहे. पण नको! एकदा तिच्या घरी जाऊया. इतर लोकाना जरा समजून घेवू. मग सांगू.

**सरिता-**

बापरे सुटले बाई. केवढं टेन्शन होतं. घर आलं. घरी काय सांगायचं पण? जाऊ दे सुचेल काहीतरी. नाहीतरी आज सरस्वती जिभेवर नाचत होती. तिची सोबत इथे पण लाभेल. मला वाटतं ते हळूच हंसत होते. बहुतेक होकारच येईल. नकार देण्यासारखं काय केलंय? उद्याचा दिवस थांबेन परवा सरळ फोन करायचा.

पण असं मागे लागलेलं बरं दिसेल? नको, त्यांचाच फोन येवू देत.

आईने येता येता भाजी आणायला सांगीतले होते. विसरलीच सगळ्यांत. बडबडणार आई. काही नाही न बोलता पिठलं ढवळून टाकू.



**संवाद-**

“काय ग, कुठे गेली होतीस एवढा वेळ? भाजी पण नाही आणलीस? आता काय करू रात्रीला?” आई.

“............”

“गप्प बसलीय. काय समजायचं?” आई

“पिठलं करीन मी. तू नको विचार करीत बसू.” सरिता

“अग पण येता येता भाजी नाही का आणायचीस? वाटेवरच तर होतं मार्केट.” आई

“तेवढे पैसे नेले नव्हते मी. विसरलेच घाई घाईत.” सरिता

“माईंकडे कशाला गेलीस? आता दुसरा मुलगा दाखवा म्हणून सांगायला गेलीस?” आई

“हे बघ आई, दुसरा मुलगा वगैरे काही नाही. त्या दिवशीच्याच मुलाला भेटून विचारायचे होते. त्याला जाणून घ्यायचे होते. आम्ही बोललो. माई होत्या तिथेच. पाहिजे तर विचार माईनाच. आता त्यांनी होकार कळवला तर लग्नच करणार मी.” सरिता

“तो आला? त्या दिवशी तू अशी वागून सुद्धा तो आला?” आई

“माईंनाच विचार ना. माझं नको डोकं खाऊ आता.” सरिता

“काय रे बाबा! काय वागतेय ही. घरी काही पत्ताच लागू देत नाही काय करतेय त्याचा. अहो ऐकलं का! ही काय म्हणतेय बघा! ” आई

“काय झालं? कोण काय म्हणतंय?” तिचे बाबा आत येत विचारत होते.

“अहो ही म्हणे त्या दिवशीच्या मुलाला भेटून आली. माईंकडे भेटली.” आई

“आता काय उपयोग. एवढ्या दिवसांत त्याच्याकडून काहीच कळवले नाही. म्हणजे नकारच समजायचा. हिच्या वागण्यानंतर आणखी काय होणार होतं?” बाबा.

“अहो पण तो भेटला म्हणे हिला. व होकार नकार कळवणार म्हणालाय” आई

“मनचे मांडे खाऊ नका उगीच. असं कधी होत नाही.” बाबा

**सरिता-**

बाबाना काहीच खरं वाटत नाही. राहू दे. बघू काय उत्तर येतं ते. आत्ता बोलण्यात अर्थ नाही. पण जर होकार आला तर? पैसे कसे उभे करायचे? मागणारा दिसत नाही. पण काहीतरी देणं घेणं असणारच. ते कसं मॅनेज करणार? माझ्या बॅंकेत तर तीनच हजार रूपये आहेत. सहा महिन्यात काटकसर करून वापरले तरी फार तर आणखी दोनहजार. पांच हजारात काय लग्न होणार! माझी नेहमीच अशी गडबड उडते.

मारे धांवली त्यांना मनवायला. आता होकार आला तर पैसे गोळा करताना काय होईल? खरंच मन किती विचार करायला लावतंय. आनंद व चिंता दोघांवर झोका घेत बसलंय. झोप देखील उडालीय.

...........

.............

सकाळ भकास वाटतेय. जागरणाचा परिणाम दुसरं काय! आज ऑफिसमधे तरी लक्ष लागणार की नाही? नाहीतर कामात चुका झाल्या तर साहेबाची बोलणी खायची. मग परत मनःस्ताप.

**संवाद-**

“काय ग आज अशी काय दिसतेयस? कसल्या चिंतेने पछाडलीयस?” समृद्धी विचारत होती.

“काही नाही ग! रात्री झोपच लागली नाही. डोकं भणभणतंय जागरणाने.” सरिता

“रजा घे ना मग अर्ध्या दिवसाची. काढ झोप सणसणीत. तुझ्याकडे बघूनच मिळेल तुला रजा. पण काय ग झोप कशाने उडाली? काय लग्न बिग्न ठरतंय काय? आणि मधे तुला कोणतरी बघायला येणार होता, तुझ्या मर्जी विरुद्ध. त्याचं काय झालं?” समृद्धी विचारत होती.

“अग तोच तर प्रॉब्लेम झालाय. पहिल्यांदा मी पळवलाच त्याला. मग घरातल्यानी बोलणं सोडलं. पाहिलं तर मुलगा फार शांत समजूतदार वाटला. शिकलेला आहे. मग एकदा भेटून बोलले तर बरं वाटलं. आता उत्तराची वाट पहातेय. पण हो म्हणाला तर लग्नाचं कसं जमणार हीच विवंचना आहे.” सरिता

“अग एवढा विचार नको करूस. होईल सगळं सुरळीत. विचार करून काही होत नाही. वरच्याच्या मनात असेल ते होणारच. हो आणि नाही दोन्ही.” समृद्धी.

“बाई! तुमचा फोन. घ्या लवकर.” फोन ऑपरेटर डिकोस्टा ओरडून सांगत होता.

“हॅलो” सरिता

“हॅलो! मी बोलतोय. रविवारी पुरणपोळ्या खायला येऊ का? पहा तुमची दुसरी काही कमिटमेंट नसेल तर.” सुभाष

“..........”सरिता स्तब्ध होऊन उभी.

"हॅलो! मी काय विचारलं समजलं का? प्रॉब्लेम असेल तर नंतर कधीतरी." सुभाष

"नाही! नाही! चालेल चालेल. मी करते तयारी" गडबडलेली सरिता बडबडून गेली.

"बरं तर मग रविवारी दुपारी बाराच्या दरम्यान पोहोचेन मी. चालेल?" सुभाष

"हो चालेल . ठेवू फोन? ऑफिसमधे जास्तवेळ नको बोलायला." सरिता

"बरं, भेटू रविवारी" सुभाष

"काय ग होकार आला वाटतं? केवढा गडबडला होता चेहेरा तुझा बोलताना. आणि आता एकदम आनंद ओसंडतोय. त्याचाच होता ना?" अजून तिथेच उभी असलेली समृद्धी खोडी काढत बोलली.

"हो ग पण फोन अचानक आल्यामुळे गडबडले मी. रविवारी घरी येतो म्हणालेत." सरिता

"कॉंग्रॅट्स! मग आता हवेत असणार तू रविवारपर्यंत." समृद्धी

"कसलं हवेत असणार! आधी पळवून लावला, मग प्रयत्न करून वळवला. घरचे काय म्हणतील? सांगायचं कसं हा प्रॉब्लेम आहेच." सरिता.

"अग त्यात काय एवढं, सांगायचं त्याला भेटले व मन वळवलं. आता मी पसंत आहे त्याला. घरचे सुटकेचा श्वास घेतील. लग्न जुळणं फार अवघड असतं ग बाई. आईबाबांना आनंदच होईल." समृद्धी

**सरिता-**

चला केवढं मोकळं मोकळं वाटतय. सकाळचा शीण गेला केंव्हांच. मी तरंगतच चाललेय घरी. लवकरच फोन केला म्हणायचा. रविवारला अजून तीन दिवस आहेत. छळणार हे तीन दिवस. लवकर जाता जाणार नाहीत.

पण तो मला पसंत कसं करतोय काही गडबड तर नाही? हो कुठेतरी प्रेम प्रकरण असायचं. तिच्याशी लग्न होणार नसायचं. म्हणून मला निवडायचं व मग तिच्याबरोबर सुरू. एवढा शिकलेला, चांगली नोकरीवाला, मला कसं पसत करतोय?

जाऊ दे माझं मनच फार संशयी होत चाललंय. मी अशी संशयी कधीच नव्हते. हा संशय कुठचाही आनंद धड घ्यायला देतच नाही. कालपर्यंत होकाराची वाट पहात होते. आज जरा कुठे चांगली चिन्ह दिसली तर नको नको ते विचार सुरू झालेत. आनंद घ्यायला आपल्याला जमत का नाही?

भेटल्यावर सरळ विचारून सोक्षमोक्ष लावला पाहिजे. नस्ता ताप नको डोक्याला. संशय दूर केलाच पाहिजे. आयुष्य काढायचं आहे बरोबर. संशयाचं भूत किती दिवस बाळगणार?

हो विचारून नवा घोटाळा करून ठेवते. तो चिडला आणि गेला तर मग परत मनवता तरी येईल का? चांगला मुलगा आहे मीच म्हणतेय, मग त्याच्यावर संशय घेतेय. हे मन भयंकर विषारी आहे. मला धड कुठली गोष्ट आनंदाने करूच देत नाही. मीच संशयी आहे. त्याचा संसार तर बिघडवून ठेवणार नाही ना?

पण आजकाल हे संशयाचे भूत सारखे मनात डोकावते.

आता घर येईलच. रविवारसाठी वाण्याकडून सामान घेऊनच जाऊ. मग घाई नको. आईला सांगीतलं पाहिजे. नाहीतर सामान वापरून टाकेल. मग रविवारी परत शोभा.

**संवाद-**

“काय ग! हे सामान कसलं आणलंस? बाबांनी महिन्याचं सामान केव्हाच आणून टाकलंय. तू आणि काय घेऊन आलीस?” सरिताची आई.

“रविवारी काही लोक जेवायला येणार आहेत. पुरणपोळी खायचीय माझ्या हातची.” सरिता

“कोण येणार आहेत ग? ऑफिस मधले?” आई

“बघशीलच ग रविवारी. आत्ताच नाही सांगत.” सरिता

“का ग! काय दडवण्या सारखं आहे का? की लग्न बिग्न ठरवलंयस परस्पर. बघ हो आणखी काही घोटाळा नको करूस. बाबांचं डोकं आधीच फिरलंय. त्या दिवसापासून” आई

“कुठून कुठे जातेस तू आई? तसलं काही मी करणार नाही एवढी खात्री तर बाळग. बघ रविवारपर्यंत वाट” सरिता

“लग्न ठरवलंस का? तुम्ही नोकरी करणाऱ्या पोरी काय कराल सांगता येत नाही. जातीतला असला तर ठीक नाहीतर घरात गोंधळ घालून ठेवशील.” आई

“किती संशय घेशील? फार संशयी बाई आहेस तू.” सरिता

**सुभाष-**

फोन केला खरा, पण मूडमधे नसल्या सारखी वाटली. काय असेल? ऑफिसमधे बोलणं शक्य झालं नसेल. रविवारी मान्य तर केलं, पण गैरसमज नाही ना व्हायचा? मी काही अजून पक्कं नाही केलं. स्वभाव बराचसा माहीत करून घ्यावा लागेल. घरच्या लोकाबद्दल माहिती होईल.

पण एवढं खरं वाटतय की अव्याच्या म्हणण्याप्रमाणेच वारे वहातायत. हिचेच विचार मनात येत असतात. असा काय प्रभाव पडलाय तोच समजत नाही. चटपटीत आहे, बोलकी आहे, शिकली नसली तरी विचार स्पष्ट वाटतात, रागीट असावी असा संशय येतोय. अजून भेटी झाल्यातर इतर स्वभाव माहीत पडेल. म्हणूनच तर हा रविवारचा बेत ठरवला. पण यांत एक रिस्क घेतलंय. मी मुलगी पसंत केल्याचा सोयीस्कर गैरसमज होईल. तो काढायचा कसा? परत विचार विचार विचार! हे चक्र थांबलं पाहिजे.

रविवारी जाताना काय नेऊया? सर्वांसाठी म्हणूनच नेवू. तिच्यासाठी नेलं तर गैरसमज वाढेल. काय नेऊया बरे! एकादा शो पीस? नको! फ्लॅट असला तरी छोटाच आहे. एवढी माणसे, शिकणारी भावंडे, त्यांना आधीच पुरताना कठीण. त्यात शो पीस ठेवणार कुठे? मग उपयोगी वस्तु कोणती? बापरे बजरंगी आयुष्या पेक्षा संसारी आयुष्य कठीण दिसते. काय द्यायचे यावरच अडलोय किती वेळ. नंतर तर किती तरी प्रसंग येतील तेव्हा काय होईल?

तेव्हा तर साथीला असणार ना ती. मग करील तीच काय ते. त्या बाबतीत ही समजूतदार दिसली. माईंकडे भेटायचे ठरवले तर सर्व काही तयार करूनच आणले. माईना त्रास नको हा समजूतदारपणा. काय तर म्हणे गाजर संत्र्याचा हलवा. माईंचा त्रास वांचवला व आपल्यालाही हाताची चव पारखवली. हुषार आहे! एका दगडात दोन पक्षी कसे मारायचे हे बरोबर जमते.

तिलाच विचारुया का? का रे बाबा लग्ना अगोदरच संसार सुरू करतोयस का तिच्याबरोबर? ती कशी सांगेल? मग काय घेऊया? चला मिठाईच नेवू. नको! नको! मग तर पसंतीचं शिक्का मोर्तबच होईल.

काहीच सुचलं नाही की देवावर सोडून द्यायचं. पण मी देवाला कुठे मानतो. बघू रविवारी सुचेल ते नेवू.

चला जरा कॅन्टीनमधे चहा पिऊन फ्रेश होऊ.



**सरिता-**

शनीवारी दांडी मारली पाहिजे. घर आवरलं पाहिजे. जरा नीटनेटकं तर दिसलं पाहिजे? नाहीतर त्यांना काय वाटेल? पहायला आले त्या वेळी आईनेच आवरा आवर केली होती. मी काही पण मदत नव्हती केली. राग आला होता. मना विरूद्ध तर होतंच, पण एवढ्यात लग्न करणार नाही म्हणाले तरी प्रोग्रॅम केला, त्याचा राग जास्त होता.

आता मीच ठरवलाय बेत. आईला काहीच कल्पना नाही. मग ती कशाला करेल मदत. मलाच कंबर कसली पाहिजे.

जेवायला काय काय करूया बरं, पुरणपोळी व कटाची आमटी आहेच पण भाजी कसली करू? बटाट्याची? नको ती अगदीच सोपी. सुगरण वाटली पाहिजे. मग एकादी छानशी उसळ करूया का? आवडी निवडी काही माहीतच नाहीत. उसळी आवडत नसल्या तर? भाजी व उसळ दोन्ही करूया का? केवढी तिरपीट उडालीय? काहीच ठाम ठरत नाही. रविवारी माईंना बोलवूया का? मग आई बाबांवर बोलताना थोडा दाब राहील. नाहीतर संवयीप्रमाणे बडबडतील काहीतरी त्यांच्यासमोरच. माई मेनूही सुचवतील चांगलासा. आईला विचारलं असतं पण मग ती खोदून खोदून विचारणार, कोण येणार म्हणून. नकोच ते.

पण एवढं खरं हीच शेवटची संधी आहे. पुरा इंप्रेस झाला पाहिजे. नाही म्हणायला जागाच ठेवायची नाही.

................

................

उद्या प्रोग्रॅम आज दांडी मारून घर आवरले. मनासारखे सजलेय. फ्लॉवरपॉटमधे उद्या फुले आणून लावली की झाले. नाहीतरी दोन खोल्यांत काय सजावट करणार? वर आईची भुणभुण चालूच होती. “कोण एवढं येणार?” विचारणं चालूच.

मनात खूप हुरहुर लागून राहिलीय. उद्या सर्व बेत जमेलना? माई बाहेरगावी गेल्यात. एकटीनेच लढवायचाय गढ. जमेल ना?

**संवाद-**

“सक्काळीच उठून काय करतेय ग ही? आज काय आहे?” बाबा.

“काही सांगत नाही. कोणी जेवायला येणार म्हणतेय. कोण ते सांगत नाही. रविवार असूनही तुम्हाला ऑफिसला जायचंय म्हणता. ऑफिसला तुम्ही नाही गेलात तर बरे म्हणत होती ती.” आई.

“कशाला! पगार कापला जाईल माझा. दुष्काळात तेरावा महिना.” बाबा.

“मलाही वाटते तुम्ही नका जाऊ. काहीतरी लग्नाबिग्नाचे तिनेच ठरवले असेल तर मी एकटी काय बोलणार. कोण कुठला असेल ते नको बघायला?” आई.

“मला नाही वाटत लग्न करेल. नाहीच म्हणत होती ना आत्तापर्यंत? मग?” बाबा

“अहो नोकरी करणाऱ्या मुली. पहिलेच ठरवले असेल परस्पर. आता आपण जोर करतोय म्हणून ठरवलं असेल आपल्याला सांगायचं. बघा बाबा मला तर काळजी वाटते. तुम्ही रहा घरी. जातीपातीचा असला म्हणजे मिळवली.” आई.

“असं म्हणतेस! मग नाही जात. पण तिनेच ठरवलं असेल तर आपण काय बोलणार? किती रागीट आहे माहीत आहे तुला.” बाबा.

“खरं हो! पण मुलांचं बरं वाईट आपण नको का बघायला? तसंच वाटलं तर समजवावं लागेल तिला. नाहीच मानले तर ती आणि तिचं नशीब.” आई.

“अगोदरच त्रास नको करून घेऊस. पाहू काय होतं ते” बाबा.

**सरिता-**

प्रोग्रॅम झाला. ते जास्त आई बाबांशीच बोलत होते. आई बाबा त्यांना बघून उडालेच होते. त्यांना अपेक्षाच नव्हती. मग मात्र जोर चढला होता बाबाना. अगदी रंगून बोलत होते. जणू काय माझे लग्नच ठरले अशा समजुतीने बोलत होते. आई देखील मग मदतीला धांवली. दहावेळा म्हणत होती. “हाच येणार तर दडवलेस कशाला? मी मदत नसती का केली?” पण दडवून जो धक्का दिला त्याची खूप मजा आली.

ते गेले तरी बाबा खूप बडबडत बसले होते. आई देखील आनंदात होती. पुरणपोळ्या छान लुसलुशीत झाल्या होत्या. पण दोनच खाल्ल्या त्यांनी. आवडत नाहीत की काय? पण स्वतःच म्हणाले होते पुरणपोळ्या खायला येतो म्हणून. मग दुसरा बेत कसा करायचा? आवडलं असेल ना जेवण? म्हणाले खरे बेत चांगलाच जमलाय म्हणून. पण खरंच की रीत म्हणून ते कसं ठरवायचं?

जाऊ दे मग विचारू. फोन येईलच की दोन चार दिवसांत. लवकरच फोन यायला पाहिजे. जास्त दिवस नाही आला तर मात्र वाट आहे. नकार समजायचा दुसरं काय! पण नकार का म्हणून मानू? काहीच वावगं नाही झालेलं. परत डोकं विचारानी भरभरतंय. आता जास्त विचार नाही करायचा. आपण एवढ्यापर्यंत खेचत आणलंय. नक्कीच याच्याबरोबर ठरेल लग्न.

बाबा पहिल्यांदा दचकलेच होते. मग केवढे रंगात आले. गावच्या, आपल्या कामाच्या कितीतरी गोष्टी त्याला रंगात येवून सांगत होते. आई पण लगबगीने कामाला लागली. ते आले म्हणजे होकारच आहे, असं समजून वागत होते. मलाच माहीत की ते अजून वेळ घेणार. सगळ्याना जोखणार मगच ठरवणार. मनात धाकधुक होती. आई, बाबा काहीतरी बोलून तर जाणार नाहीत ना? एकादी गोष्ट त्याला आवडली नाही तर? मी आतच जेवणात गुंतलेली. त्याचे चेहेऱ्यावरचे भाव पहायला मिळाले नाहीत. पण जाताना सर्वांचा हंसत निरोप घेतला. बाबा म्हणाले “फिरायला जायचे असेल तर या जाऊन” असा मला टोमणाही मारला. “मला जरा काम आहे, फिरायला एवढ्यात नकोच.” म्हणून त्यांनी टाळले.

जाताना मला फक्त हात केला. बोलले काहीच नाहीत. काय समजू? असेल मनात ते कळेलच. आता फार विचार नाही करायचा.

**सुभाष-**

जेवण छानच होते. तिचे आई, बाबा मनमोकळे वाटले. पहिल्यांदा मला पाहून आश्चर्यात पडल्यासारखे वाटले पण मग खूप गप्पा मारत होते. आई देखील हंसत बोलत होत्या. सारख्या आतबाहेर करीत होत्या. ती मात्र आतच गुरफटली होती. मग घरी कशाला बोलवायचं?

आई म्हणत होत्या जेवण करायची हौस फार. त्यांना देखील कामाला हात लावू देत नाही. फार रागीट आहे. आई फार वेळ बाहेरच होत्या. खरंच असावं. पण रागीट पणा अजून तरी दिसला नव्हता.

लग्ना अगोदर फिरायचं नाही. घरी जेवण करणं आलंच पाहिजे. असे आजच्या जगांत न चालणारे विचार पकडून बसलेली दिसतेय. कॉन्झरवेटीव दिसतेय. पण माईंकडे भेटलो तेव्हा बोल्ड वाटली. कॉम्प्लेक्स पर्सनॅलिटी आहे की काय? काही असो. आज तिथे जाऊन आपण पूर्ण अडकलोय. नकार कळवण्याला कारण तर पाहिजे. आई, वडील सरळ बोलणारे. ही कामसू व पाककलेत चांगलीच निपुण. पत्रिका पाहायची नाही आधीच कळवून बसलोय. आता काय कळवू? “रागीट आहे जमायचे नाही” म्हणून? पण मला तर रागीटपणाचा अनुभव नाही आलाय.

पण मी हे निगेटीव विचार का करतोय? नकार द्यायची कारणं शोधण्याची जरुरच काय? हा माझा स्वभावच नाही. त्यापेक्षा आपण तिची पर्सनॅलिटी आपल्याला पाहिजे तशी बदलू शकतो का? ती किती रागीट आहे, ते तपासावं लागेल. त्यासाठी थोडातरी सहवास लागेल. मुद्दाम कळ काढून रागाचं मोजमाप काढावं लागेल. पण त्यासाठी सहवास लागेल. दोघानीच काही तास एकत्र घालवावे लागतील.

त्या शिवाय कसं शक्य आहे? पण ते शक्य दिसत नाही. तिने अगोदरच सांगीतलं आहे. लग्न ठरल्या शिवाय एकत्र फिरणे नाही.

एकच मार्ग उरतो. पसंती कळवून लग्नानंतर तिला आपण बदलायचं. आपल्याला पाहिजे तसं मोल्ड करायचं.

पण ती तशी नाही झाली तर? तर काय! फार तर आपल्याला थोडं समजून घ्यावं लागेल. ऍडजेस्ट करावं लागेल. काय फार मोठं रीस्क आहे असं नाही. नाहीतरी आयुष्य ही एक मोठी तडजोडच असते. तसा मोठा प्रॉब्लेम येणार नाही. कॉन्झरवेटीव लोक चाकोरीतून जाणारे असतात. अगोदरच ओळखता येतात.

मग नक्की काय करू? माईंशी थोडं बोलून पाहू. त्यांना माहिती असेलच स्वभावाची.

.......

.......

दोन दिवस झाले माई फोन का उचलत नाहीत? बरोबर! त्या म्हणाल्या होत्या कुठेतरी जाणार म्हणून. अजून आलेल्या दिसत नाहीत. जास्त उशीर करून चालणार नाही. परत संध्याकाळी फोन करून पाहू, नाहीतर मग उद्या तिलाच करावा लागेल.

**संवाद-**

“हॅल्लो, माई का?” सुभाष.

“हो! बोल रे काय म्हणतोस! ” माई

“माई, पहिला प्रसंग सोडला तर नाव ठेवण्या सारखं नाही. मी गेलो होतो जेवायला त्यांच्याकडे. जेवण छान केले होते. पण एकंदर फार रागीट वाटली. तुम्ही जास्त ओळखता त्यांना. म्हणून म्हटले तुम्हाला विचारावे. दुसरे काही नाही.” सुभाष.

“अरे राग, लोभ कुणाला सुटलेत का? प्रत्येकात थोडेफार असतातच. बाकी काय घराणे, लोकं पहायची, ही आमची जुनी पद्धत. मी त्यांच्याकडे वारंवार जात नाही. पण या घराण्यातले सर्वच ओळखीचे आहेत. तिच्या मामा, मावशा वगैरे. सगळे चांगले आहेत. आजकाल तुम्ही काय पहाता ते मला नाही माहीत. ते तू बघ, मी काय सांगणार त्यात.” माई

“बरोबर आहे माई, मला आता उगीच कीस काढायचा नाही. त्यांना होकार सांगा. पण दोन अटी सांगा. लग्न अगदी साधेपणाने कमीत कमी खर्चात करायचे. व ते जागा ताब्यात मिळाल्यानंतर करायचे.” सुभाष.

“ते बरोबर रे, पण तुझी जागा लांबली तर काय लग्न लटकवत ठेवणार? काहीतरी मर्यादा असेलच ना? मला विचारतीलच ते. काय सांगायच मी?” माई

“हो तेही खरंच. जागा चार महिन्यांत मिळेल म्हणतोय. सहा महिन्यानी करू. जागा नाही मिळाली तर भाड्याने घेईन थोडे दिवस.” सुभाष.

“ठीक आहे, सांगते मी त्यांना तसे. मग हे नक्की ना? मला दोष नको म्हणून विचारते.” माई

“मी फार वेळ घेतलाय, पण हे बोलतोय ते विचाराअंतीच. एक गोष्ट सांगा, मला पत्रिकेवर विश्वास नाही.” सुभाष.

“बरं कळवते मी त्यांना. कदाचित त्यांच्याकडे जाऊनच बोलेन व तुला सर्वच बोलणे सांगेन. परवा घरीच ये.” माई.



**सुभाष-**

आज एकदम हलकं वाटू लागलय. ताण निघून गेलाय. एवढा ताण मनावर

असेल याची कल्पनाच नव्हती. आता ते काय ते कळवतील. तोपर्यंत आराम. माई काय सांगतात ते बघू परवा.

अव्याचं म्हणणं खरं ठरलंय. कसं काय कयास बांधतो अव्या. त्यानेच काय पण माझ्या कुणीही मित्राने अजून तिला पाहिलेले नाही. मग तिचा स्वभाव कसा काय ताडला? कधीतरी विचारलं पाहजे अव्याला. अव्या एक कोडंच आहे. एवढ्या मुली बघतो आणि नाकारतो. काय पसंत नाही ते बोलतच नाही. असे मुलींचे अपमान करणं पटत नाही मनाला. पण अव्याला काहीच वाटत नाही. विचारलं तर म्हणतो, आयुष्याचा प्रश्न आहे. चूक केली तर आयुष्यभर निभवावं लागतं. याला जणू अनुभवच असल्या सारखा बोलतो. पाहू काय करतो ते.

पक्याची गोष्टच वेगळी. कर्मठ घर. आई बाबा बघतील तिथेच लग्न करणार तो. जातवालीच पाहिजे. शिकलेली असावी पण घरकामांत तरबेज असलीच पाहिजे ही अट. त्याचं बरं आहे. वैचारिक पातळी, जुळते स्वभाव, कशाबद्दलही विचार करायचा नाही. आईबाबांनी पसंत केलीय ना, मग करायचे लग्न. त्याला विचारलं पाहिजे, नंतर नाही जमलं तुझं तर काय करशील?

पण मी होकार कळवलाय. आता काय होईल? त्यांचे उत्तर “हो” च असणार. म्हणजे लवकरच आपण संसारी होणार. नवी जबाबदारी, नवं आयुष्य जोडीदाराबरोबरच. आत्तापर्यंत स्वतःच्या मर्जीनं सगळं करीत होतो. आता सहचारिणीचा सल्ला घ्यावा लागणार. मतं जुळली पाहिजेत. स्वभाव जुळले पाहिजेत. तडजोड येणार. त्यालाच संसार म्हणायचा का? पण या सर्वांचा विचार झालाच आहे. बायकोसाठी जगणं, मुलांसाठी जगणं यांतही एक अप्रतीम सौख्य असतं. मायेचा उबदार आधार आयुष्याची लज्जत वाढवतो. आपल्याला त्याचाच अनुभव सुरू करायचा आहे. छान साथ मिळाली की मजाच येईल. तशी ही मुलगी साथ देईल असंच वाटतं.

संध्याकाळ होतेय सहा वाजलेत. पक्या, अव्या आले असतीलच जरा पाय आणि मन मोकळे करून येवू. पण होकार आल्याशिवाय त्यांना काही कळू द्यायचे नाही.

**संवाद-**

पक्या- “अरे किती उशीर करतोस रे! आजची सनसनाटी बातमी ऐकायला लेट आलास.”

सुभाष- “काय रे कसली बातमी.”

पक्या- “लग्न ठरल्याची बातमी मिळाली तर ती सनसनाटी ठरणारच ना?”

सुभाष - “कोणी सांगीतलं तुला लग्न ठरले म्हणून?”

पक्या- “अरे तुझे नाही रे, या अव्याने मुलगी पसंत केली. दमला रे शेवटी पोरी पाहून.”

अव्या- “दमतोय कशाला? पण मला पाहिजेत तशी बरीच लक्षणं दिसून आली. मग होकार दिला. पण काय रे पक्या हा का दचकला? याचाही विचार झालेला दिसतोय काय?”

पक्या- “काय रे तुझंही पक्क का? बरं आहे! दोन दोन मेजवान्या मिळणार या वर्षी.”

सुभाष - “तू अव्याचीच मेजवानी पकडून चाल. माझे अजून तरी नक्की नाही. आणि झाले तरी सहा महिने लग्न करता येणार नाही ”.

बेरकी नजरेने न्याहाळणारा अव्या ओरडत म्हणाला- “कुछ तो पाणी मुरता है पक्या. याचंही ठरलंय बघ.”

सुभाष - “अव्या एकाच भाषेत बोल. दुसरीची वाट कशाला लावतोस? आणि माझं ठरलं की पहिल्यांदा तुम्हालाच सांगेन. दुसऱ्या कोणाला सांगणार?”

अव्या- “सांगू देत रे तो काहीपण! पण मी त्याचा चेहरा वाचलाय. नक्कीच ठरेल बघ.”

पक्या- “जणू याला दिव्य दृष्टी आहे! तुझ्यावर जाम राग आहे रे अव्याचा.”

सुभाष - “त्याला काय करणार मी. जाईल त्याचा राग हळू हळू.”

पक्या- “अरे पण तू त्याच्या बहिणीला का पसंत नाही करीत? ओळखीतली तर आहे. आणि तुझ्यावर तिचा फार जीव आहे. बघ परत विचार कर. मग अव्याची दोस्ती पण राहील. मला भीती वाटते, दोस्त तुटणार तर नाहीत.”

सुभाष - .............

अव्या- “काय उपयोग नाय रे. जाऊ दे त्याला. मी बघेन एकदम चांगला मुलगा बहिणीसाठी. त्याला पडू दे खडड्यांत. अरे जीव लावणारी पोरगी एखाद्यालाच मिळते. याला काय माहीत.”

सुभाष - “सोडा रे हा विषय. मला मनाला पटत नाही ते मी करत नाही.”

अव्या- “त्याला म्हणे ती नखरेल वाटते. अरे तिला एअर होस्टेस व्हायचंय. मग करणारच ती जराशी फॅशन. आणि याला नाही आवडलं तर सोडून देईल ती विचार, एअर होस्टेस होण्याचा. पण हे बोलतील तेव्हा? फार विचारी पडले. पण एवढ्यावरून मी काही मैत्री सोडत नाही रे पक्या. पुढे याला फार मदत लागेल आपली.”

पक्या- “तू काय ज्योतिषी होणार आहेस काय रे, मघापासून ज्योतिष सांगत बसलायस.”

अव्या- "काय रे बाबा, तुला तिचा फोन बीन आला की नाही? गाडी पुढे सरकलीच पाहिजे एवढ्यात . नायतर माझा फुकटचा गुलाम सटकेल माझ्या हातून. काय पक्या! "

पक्या- "तू बस आता मनचे मांडे खात. आता काही याचे त्या मुलीबरोबर जमत नाही घे. तू हरणार नक्की."

सुभाष - "पक्या, अव्या अरे तुम्हाला दुसरा विषय नाही का रे? माझे जर काही नक्की झाले तर सांगीनच की तुम्हाला. मला ऐकायचंय ते याच्या होणाऱ्या बायको बद्दल. कशी आहे, काय शिकलीय, अव्याची पसंती काय ते नक्की कळू दे तरी."

अव्या- "अरे मी काय वर्णन करणार! असं करतो उद्या किंवा परवा तिला बोलवतो इकडे. मग घ्या तिचा इंटरव्ह्यू दोघेही."

पक्या- "फर्स्टक्लास! म्हणजे तुझ्या घरी फराळ करून तुझीच फिरकी घ्यायला बरं रे."

अव्या- "घ्या! घ्या! फिरकी घ्या, चिडवा. काही बोलायची नाही ती. मी दिलीय आयडीया तुमच्या बद्दल. कदाचित तुमचीच फिरकी घेईल ती."

सुभाष - "चला रे निघू आता. मला गेलंच पाहिजे. घर मालक जेवायचे खोळंबतील."

**सुभाष-**

हा अव्या काहीपण बडबडतो. मला काय मदत लागणार. कित्येक गोष्टी स्वतःच ठरवून मोकळा. त्याचंही लग्न ठरलं हे बरं झालं. एवढ्या मुली नाकारून शेवटी ठरलं ते बरंच झालं किती मुलींचा नाकारून अपमान करायचा. थांबेल आता ते.

पण याने काय निकष लावलायचे ठरवले होते देव जाणे. एक मात्र खरे, त्याच्यावर जबाबदाऱ्या फार आहेत. निवृत्त आई वडील, लग्नाची बहीण व एक शिकणारा लहान भाऊ. तसा अव्या सगळया कुटुंबाची काळजी घेत जगणारा. तोंडाने थोडा तिखट वाटला तरी आतून मायाळू आहे. सगळं कुटुंबच एकमेकाशी घट्ट संबंध ठेवून आहे. त्याला खरंच कुटुंबात समावून जाणारी, सगळ्याना समजून घेणारीच बायको मिळाली पाहिजे. असेल का ती अशी?

अव्याने बोलावलेच आहे त्यावेळी समजेलच.

**संवाद-**

“हॅलो! मी बोलतेय.” सरिता

“बोला.” सुभाष

“तुम्ही होकार कळवलात. थँक्स! बाबांनी विचारलंय केव्हा भेटायला येवू म्हणून. काय सांगू त्यांना?” सरिता

“मीच येईन रविवारी. तुमच्या घरी भेटू. मी पेईंगगेस्ट म्हणून राहातो. त्यांना नको त्रास.” सुभाष

“सकाळीच येणार? जेवायलाच या.” सरिता

“सकाळी नाही. अव्याकडे जायचंय. त्याचं लग्न ठरलं त्याची पार्टी आहे त्याच्या घरी. चार वाजता येईन मी.” सुभाष

“ठीक आहे. सांगते मी तसं बाबाना” सरिता

“बरं! आणि तशी बोलणी काहीच नाहीत. मला काहीच मागायचेच नाही.” सुभाष

“हो पण इतरही गोष्टी असतात ना. बोलतील बाबा काय ते. आणि तुमच्याकडचे कोणी मोठे येण्यासारखे नाहीत?” सरिता

“माझा एकही नातेवाईक नाही इथे. सगळे गावी. कशाला कोणाला बोलवून त्रास देऊ! ” सुभाष

“हो पण आईवडील मागाहून बोलतीलच की, न विचारता लग्न केलेत तर.” सरिता

“वडील नाहीत. आई आहे. ती काहीच बोलणार नाही. मुलाचं लग्न हीच आनंदाची बाब आहे तिच्यासाठी.” सुभाष .

“बरे! आता ठेवू? ऑफिसमधून बोलतेय जास्त वेळ नको.” सरिता

“ओ के ठीक.” सुभाष

**अमोल-**

आज अविदादा सांगत होता, सुभाषने लग्न ठरवले. कशी असेल ती? सांभाळेल ना त्याला? खरं तर सुभाषवर मनापासून प्रेम केलं मी.का नाही म्हणाला ते कधी समजलेच नाही. अविदादाने सांगितले की त्याला माहीत आहे माझ्या मनातले, तेव्हा केवढा आनंद झाला होता. वाटले होते जरुर भेटणार तो. पण तो घरी यायचाच बंद झाला. एक दिवशी अविदादा म्हणाला, “अमु, एवढा जीव लावून बसू नकोस त्याच्यावर. दुःखी होशील. त्याला तू एअर होस्टेस होणार हेच आवडत नाही. तू फार फॅशन करतेस असं म्हणतो. स्वतः हुशार, त्यामुळे सगळे तसेच असावेत असे वाटत असेल त्याला.”

त्या दिवशीपासून मी अभ्यासावर लक्ष देऊ लागले. एअर होस्टेसचा छंद सोडून दिला. त्याला पाहिजे तसे व्हायचे ठरवले. तो घरी आला की त्याला समजेल व मत बदलेल असा समज करून घेतला. पण आज त्याचे लग्न ठरलेले समजले आणि सगळे मनसुबे कोसळले. पण त्याच्याबद्दल जराही राग नाही आला.

चार दिवस विषण्ण होते. मग विचार आला, सुभाष हे लग्न ठरवून चूक तर नाही करत, अंधारात तीर तर मारीत नाही? कोणतीच ओळख नसताना मुलीशी याचे पटेलच कशावरून? हा दुःखी तर होणार नाही?

एक खरे की मन वेगवेगळे विचार करीतच राहिले. मग वाटले आपणही कोणीतरी बनायचे. छान करीयर करायची. पाहू पुढे कसे काय होते ते. पण नाउमेद जराही नाही व्हायचे. मन हळू हळू स्थिर, दृढ होऊ लागले.

**सरिता-**

चला बाई! संपली दगदग धावपळ. रविवारी सगळं होईल नक्की. आईबाबांनी काही घोळ घालता नये. जास्त काही मागणारे नाहीत. लग्नही साधंच करायचं. सगळंच कसं आपल्याला पाहिजे तसं जवळ जवळ फुकटांतच लग्न होतंय. असं कधीच मिळालं नसतं. बरं झालं जरा नेटाने मागे लागले ते. पण एवढा चांगला मुलगा असं फुकटात कसं काय लग्न करायला तयार होतोय? खरंच गडबड तर नाही. झालं परत संशयाचं भूत गोंधळ घालायला लागलं. गप्प रहा रे मना.

रविवारी काय बेत करूया? इडली सांबार करू. म्हणजे भरपूर खायला घालून पाठवता येईल. घरी जाऊन जेवण्याचा प्रश्नच येणार नाही. पेईंग गेस्ट म्हणजे ते करतील ते खात असतील हे. यांना काय पाहिजे नको विचारत तरी असतील की नाही देव जाणे. पुढ्यांत येईल ते खायचे.

हो पण इडली आवडतात की नाही? विचारून घेऊ उद्या.

**संवाद-**

“या! या! बसा.” बाबा

“आलात, या! अहो आम्ही माईंना बोलवायचेच विसरलो.” आई

“मी बोलावले, पण त्यांना कुठेतरी जायचे आहे म्हणाल्यात” सुभाष .

“अस्सं! बरं झालं तुम्ही तरी बोलावलंत. नाहीतर फुकट दोष लागला असता.” आई.

“पाणी.” सरिता

“हो” पाणी घेऊन पीत असतानाच तो सजलेल्या तिला पहात होता.

“बरं मग, आता पुढे काय ठरवलंत? मुलगी पसंत असेल तर पुढचं ठरवायला बरं” बाबांनी एकदम विषयालाच हात घातला.

“अहो! थांबा जरा चहापाणी होऊ दे. मग बोला.” आई.

“हे पहा! लग्न म्हणजे दोन कुटुंबाचं सर्वार्थाने एकरूप होणं. त्यात काही मागून आंबटपणा यावा असं मला वाटत नाही. लग्न अगदी साधं, अगदी जवळच्या लोकाना बोलावून व्हावं एवढीच इच्छा. मला काहीही मागायचे नाही. लग्नाचा खर्च वाटूनच करायचा.” सुभाष

“अहो पण रीतिरिवाज आहेतच ना! जवळच्या लोकाचे मानपान करावेच लागतील. नाहीतर बरे दिसणार नाही.” बाबा

“पहा या सगळ्यात मी मानत नाही. पण तुमच्या समाधानासाठी तुम्ही काय ते करा. माझी मात्र कोणतीच मागणी नाही.” सुभाष.

**सरिता-**

बाबा तरंगताहेत, एवढे झटपट सगळे होईल असे त्यांना वाटलेच नव्हते. जोर जोरांत आईला विचारून दागिन्यांचा पडताळा केला. बँक अकाऊंट पाहू लागले. कपडे लत्ते काय करायचे ठरवणे वगैरे बोलू लागले. आणि मी एकदम बोलून गेले. अजून सहा महिने आहेत लग्नाला आत्तापासून कशाला ठरवताय?

बाबा गप्प झाले. आईने मग टुमणे सुरू केले. साखरपुडा करून टाका. मी गप्पच होते.

आता जे काय करायचे ते बघतील म्हणून मी स्वस्थ झाले.

साखरपुडा झाला, फिरणे होऊ लागले. आणि सुंदर सुखाचे दिवस पिंगा घालू लागले. सहा महिने हां हां म्हणता निघून गेले व लग्नाचा दिवस उजाडला.

संध्याकाळी रिसेप्शनला यांचे खूप मित्र येत होते. सगळ्यांची ओळख वगैरे चालली होती. एवढ्यात दोन मित्र येताना यांना दिसले तसे म्हणाले “ही जोडी खास आहे. माझे जवळचे मित्र. कायम आपल्या कडे येणार.” मी त्यांना पहात होते. हे तर सकाळपासूनच होते. पण ओळख झाली नव्हती.

**संवाद-**


“हा अविनाश, ही वहिनी अविनाशची बायको, हा प्रकाश. मी या दोघाना अव्या आणि पक्याच म्हणतो. खास आहेत. लक्षांत ठेव.” सुभाष.

“काय रे माझे भविष्य खरे झाले ना? नमस्कार वहिनी मी अगोदरच भविष्य सांगीतले होते. हा तुमच्याशीच लग्न करणार.” अव्या

“नमस्कार वहिनी, मी प्रकाश तुमच्या ह्यांचा खास दोस्त.”  प्रकाश.

“आणि माझा कायमचा गुलाम! माझे भविष्य खोटे ठरेल म्हणायचा. पैज लागली होती आमची.” अव्या.

“चल, चल, आता या पुढे गुलामाला काय त्या ऑर्डर दे ” प्रकाश.



**सरिता-**

नवी जागा तयार व्हायची होती. यांनी तात्पुरता भाड्याने एक ब्लॉक घेतला होता. लग्न होऊन तिथेच गेलो. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी प्रकाश व अविनाश यांच्याबरोबरच हजर झाले. मला पोहे नाहीतर भजी करायचा घोष लावला. मी सर्व तयार करून नेले.

पण अविनाश जे बोलला ते ऐकून मात्र मनात वादळ उठू लागले. मला समजले अविनाशच्या बहिणीला यांच्याशी लग्न करायचे होते. एवढे गाढे दोस्त. घरी येणे जाणे असणारच. मग यांचे काही नव्हते ना? ती म्हणे शिकलेली आहे. पाहिलेच पाहिजे तिला, माझा पहिला समज तर खरा होणार नाही ना?

हळू हळू पारा चढत होता डोक्यात संशयांचे मोहळ उठू लागले, तशी उठले व आत निघून गेले. कामे पडलीत एवढेच बोलले, ते लोक जवळ जवळ तासभर गप्पा मारीत बसले, होते. मी मनात जळफळत होते. फसल्याची जाणीव होऊन राग वाढत होता. लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी हे असे मोहोळ उठले होते, हळू हळू माई आठवल्या, त्यांचे बोलणे आठवले. मग गेल्या काही दिवसांचा सहवास आठवला. असे काही असावे असे दाखवणारा एकही प्रसंग आठवेना.

माझी मलाच लाज वाटू लागली. नको ते विचार करीत बसते. देव सुखाचे पुरे माप देतो उपभोगताच येत नाही. विचारां मागोमाग राग पण भयंकर येतो. कसं आवरायचं मन. असा कसा स्वभाव माझा? खूपशी शांत झाले. बाहेर गेले तर हे चेहेरा न्याहाळू लागले. मी तोंड फिरवले.

अविनाश आपल्या बायकोच्या उडवलेल्या खिल्ल्या सांगत होता. हे हसत नव्हते, प्रकाश थोडा हसत होता, व मला परत राग चढत होता. हे मित्र आपल्या बायकोची तिच्यामागे अशी टवाळी करतात? एवढयात यांनी बोलायला सुरवात केली.

**संवाद-**

“अव्या लग्न करून बायको म्हणून आणलेस तू तिला अशी टवाळी करणं बरोबर नाही, अरे नवरा बायको म्हणजे कसा जोडा असला पाहिजे, एकमेकाना पुरा साथ देणारा, समजून घेणारा. तुझी बायको अगदी साधी आहे. म्हणून काय तू तिची टिंगल करणार? काय बोलतोस हे समजतं का रे तुला?” सुभाष.

“बास! बास! गुरु तुम्हाला कोण सांगेल? तुम्ही सद्गुणी आहात तसे आम्ही नाहीत. काय करणार देवाने तेवढा मेंदू दिलाच नाही आम्हाला” अव्या

“चला रे भांडू नका, अव्या चल जाऊ आपण” पक्या

“अरे थांब रे! काय वहिनी थोडे थांबलो तर चालेल ना? हो आता तुम्हाला विचारलेच पाहिजे. आमच्या सद्गुणी मित्राच्या अर्धांगिनी तुम्ही, समान अधिकार आहे तुम्हाला.”अव्या

“अव्या हे फार होतेय हा! एकदा बडबडायला लागलास की भानच राहात नाही तुला. चल आता.” पक्या.

“बस जाऊया रे. मग वहिनी तुम्हाला एक सांगणे आहे. आमच्या मित्राची चांगली काळजी घ्या. आम्हाला एक आदर्श संसार पहायला मिळणार आहे.” अव्या.

“आता चलच अव्या उगीच त्यांची खेचू नकोस. चल नाहीतर मी निघतो.” पक्या.

“आप कैसे जा सकते हो भाई? आप हमारे गुलाम है. हम चलेंगे तबही चलना पडेगा आपको” अव्या.

“ए! अव्या! खूप झाले, चला निघा, तुम्ही उद्या या. घरांत खूप कामे पडलीत अजून सगळे नीट लावायचे आहे.” सुभाष.

“चलो भाई पक्या! चलो अभी. लेकीन वहिनी कल आयेंगे हम, हमेभी वो गाजर संत्रेका हलवा चखाना” अव्या.

**सरिता-**

ते गेले पण त्या अव्याचा चहाटाळपणा मला काही आवडला नाही. पण आता राग पूर्ण ओसरला होता. हळू हळू सर्व घर लागत गेले. रजा संपली नोकरी सुरू झाली. मग सहवास एकदम संध्याकाळीच होऊ लागला. हे आले की वाचत बसत, काहीतरी लिहीत असत. मी त्यात लक्ष नव्हते घालत. आवडी निवडी अशा फारशा नव्हत्याच. जेवणात, फराळाला काहीही केले तरी वाहवाच म्हणत. मला फार बरे वाटे.

असेच दिवस चालले होते व एक दिवशी मलाच ती बातमी पहिल्यांदा समजली. मी आई होणार होते. आनंद झाला. पहिले जाऊन आईला सांगून आले. आई एकदम थरारुन गेली. मग ह्यांना कसे सांगायचे हे मनात येवू लागले. एक दिवशी म्हणाले “आता मला थोडी मदत लागेल तुमची.” आणि तोंडावर हसू आले. ते काय ते समजले व चेहेऱ्यावर आनंद दिसला. पण मला तो मोजकाच वाटला. हा आनंद भरपूर का नाही? यांना बाप होण्याचा आनंद एवढा कमी का? माझ्या डोक्यांत सगळी जळमटे परत सांचू लागली. हे माझ्याबरोबर पूर्णतः खूष नाहीत?

पण एवढे खरे की पुढच्या दिवसांत माझी फार काळजी घेऊ लागले. हळू हळू मनातील संशयाची जळमटे विरून गेली.

बाळंतपणासाठी मी माहेरी गेले, एकाच शहरात माहेर व सासर. यांना आई, बाबांनी घरीच जेवायचे आमंत्रण देऊन ठेवले. पण हे कधीच आले नाहीत. एवढा मान का दाखवायचा? मला समजत नव्हते. काय जेवत असतील? कुठे जेवत असतील? असे वाटे. आईने माझी तगमग ओळखली व एक दोनदा डबा बनवून बाबांबरोबर पाठवला. ते त्यांना बरोबर वाटले नाही. असे बाबा म्हणाले.

मात्र दर रजेच्या दिवशी संध्याकाळी चार वाजता येत. प्रकृतीची चौकशी करीत व सहा वाजता परत जायला निघत. आई खूप आग्रह धरी. जेवून जा म्हणून सांगे पण हे निघून जात. मला त्यांचे

येणे एक औपचारीक व्यवहार वाटू लागला. माझा संसार औपचारिकतेवरच चाललाय असा भास होऊ लागला. गेल्या वर्षभराचा विचार करताना एक गोष्ट लक्षात आली. हे कमीच बोलणारे होते. पण हळू हळू संभाषण अजून विरळ होत चालले होते. अगदी जवळचे मित्र यायचे कमी होत जाऊन बंद झाले होते. ते बरेच झाले असे मला वाटत होते. पण हे आता आपल्याच नादात असत. काहीतरी लिहीत असत. मला वाचण्याचा, पुस्तकाचा तसा कंटाळाच. त्यामुळे ते काय लिहीतात त्या कडे माझे लक्षच नसे. मी माझ्याच घरकामात मग्न असे.

मला मुलगा झाला. दोन दिवस रजा घेऊन हे हॉस्पीटलला हजर होते. मग परत आठवड्यातून एकदा भेट सुरू झाली.

दोन तीन महिन्यांत परत घरी आल्यावर रोजचे आयुष्य सुरू झाले. मी घरचे व मुलाचे करण्यात दंग झाले. नोकरीवर जातच नव्हते. तिघांच्या संसारात दोघे नोकरीला गेले तर मुलाकडे कोण हा प्रश्न होताच. मग मीच नोकरी सोडली. हे काहीच बोलले नाहीत. मला दाट संशय येऊ लागला. माझ्यांत यांना काही रस वाटत नाही. मी त्याच विचारांत राहू लागले.

एक दिवशी यांचा मित्र प्रकाश व त्याची आई आली. मुलगा झाल्यापासून आले नव्हते. त्यांनी मुलासाठी खेळणी, कपडे आणले होते. मग त्या जरा फ्रेश व्हायला गेल्या व मला संधी मिळाली. संशयाने भरलेले मन मोकळे व्हायला हवे होते. प्रकाशला विचारले. हे तुझे चांगले दोस्त. हल्ली जास्त बोलत नाहीत. काय मनात आहे समजत नाही. प्रकाश भाओजी, यांचे अविनाशच्या बहिणीशी काहीच सबंध नव्हताना? की अजूनही तिला भेटतात?

प्रकाश दोन मिनीटे आश्चर्याने माझ्याकडे पहात राहीला. मग म्हणाला “एवढा चांगला माणूस तुमच्या आयुष्यात येऊनही तुम्ही असा विचार करतां? त्याचा तिच्याशी कधीच संबंध नव्हता. बोलणे देखिल नव्हते. आम्हाला तो हल्ली आठवडा आठवडा भेटतच नाही. भेटला तर फार विचारात

पडलेला दिसतो. अतिशय हुषार हो तो. पण आता मागे पडत चाललाय, काय झालेय विचारले तर बोलत नाही.”

एकदा फक्त एवढंच म्हणाला की माणसाने कुणाचेही प्रेम, माया धुत्कारु नये. अगदी प्राण्याचे सुद्धा, फार भोगावे लागते. त्याने तर कुणालातरी आयुष्यभर दुःखी केलेय. कोणाला म्हणून विचारले तर बोलला नाही. हे तुम्हाला का सांगतोय समजलेच असेल. तो एक अतिशय सरळमार्गी माणूस आहे. आमचा मार्गदर्शक आहे. त्यावेळी अव्या फक्त चिडवायसाठी म्हणाला होता. “खूप उशीरा समजले तुला.”

मला त्यांच्या वाक्याचा नीट अर्थ समजलाच नाही. मी आणखी विचारांत पडले. आणि तोंडातून पटकन पुढचा प्रश्न सटकला. ‘अविनाशची बहीण काय करते? झाली का एअर होस्टेस?’

तेवढ्यांत प्रकाशच्या आई आल्या त्यांनी तो प्रश्न ऐकला होता. त्या म्हणाल्या अग ती तर केव्हाच नाशिकला निघून गेली. एका मोठ्या कंपनीत मॅनेजर आहे. लग्न केले नाही, करणारही नाही म्हणते. काय हल्लीच्या मुली. करीअर करायची तर लग्न नको म्हणते.

ते लोक गेले व मला माझीच शरम वाटू लागली. मी केवढे संशय घेत बसली. एवढा चांगला नवरा मिळाला तरी मनात शंकाकुशंका. नाही यापुढे शंकाना मनात स्थान द्यायचे नाही. चांगले संभाषण करायचे. सगळे मळभ निघून गेलेच पाहिजे.

**सुभाष-**

लग्ना अगोदरचे सगळेच अंदाज चुकले. लग्न ही एक घोडचूक करून बसल्यासारखे का वाटतेय? जीव लावायचा प्रत्येक प्रयत्न ही हाणून पाडते. मी काही चांगले बोलायला गेलो की तोंडावर थोडा राग व डोळ्यांत संशय भरलेला दिसतो. बोलणेच खुंटते. लग्नाचे नवलाईचे दिवस बोटावर मोजण्या एवढेच भोगले बाकी सर्व संशयाच्या ढगांखाली काढतोय. का असे का ?

दिवसे दिवस हा “का” सतावतोय. कामावर देखील परिणाम होऊ लागलाय. माझे काम पूर्वीसारखे होत नाही म्हणून ठपका बसतोय. हे सर्व थांबवायचा, विचारच न करायचा जेवढा प्रयत्न करतोय तेवढे विचार जास्त जोरात येत चाललेत. मारे ठरवले होते, आपल्याला पाहिजे तसे मोल्ड करू. पण ही तर एक टणक भाजून तयार झालेलीच मूर्ती आहे. मोल्ड करायला गेलो तुटून फुटून जाईल.

पण संशय तरी काय आहे, तोही समजत नाही. लग्नाला दोन वर्षे होत आली. एक मुलगा झाला पण संसार सुखाची लिज्जत काही अनुभवली नाही.

मित्रांचे येणे थांबले. त्यांनी हिच्या डोळ्यातली नाराजी वाचली म्हणे. मीही जास्त आग्रह केला नाही. अव्या, पक्या देखिल यायचे बंद झाले. तेव्हा एकटा पडल्यासारखे वाटू लागले. मग डायरी व मी यांचे सख्य झाले. दररोज डायरी लिहू लागलो.

अव्या, पक्या बाहेरच भेटत. अव्यातर पूर्वीसारखा बोलत नसे. उलट फारच सहानभूतीने बोले. मला हा फरक का ते समजत नव्हते. मला हल्ली वाटे, मी फार मोठा गुन्हा केला. अव्याच्या बहिणीबरोबर कदाचित एवढा त्रास झाला नसता. तिचे प्रेम अव्हेरले, त्या प्रेमाचा अपमान केला, त्याची तर ही शिक्षा नाही ना? मग पक्याला एकदम बोलून गेलो. माणसाने कुणाचेही प्रेम धुत्कारु नये, अगदी प्राण्याचे सुद्धा प्रक्याच्या चेहेऱ्यावर मोठे प्रश्नचिन्ह दिसू लागले. मी गडबडत सावरून घ्यायला पाहिले. पक्या तरी म्हणालाच.

“अव्या म्हणत होता, तू अगदी नर्व्हस असतोस अलीकडे. बहुतेक वहिनी याला पाहिजे तशा नाही निघाल्या वाटते. आम्ही बोलू का त्यांच्याशी?”

मी एकदम हादरलो. पक्याला असा विचारसुद्धा आणू नकोस म्हणालो, मनात आले, असे काही हे जर बोलले तर ती वर वर म्हणणार. "मी कुठे काय बोलले?" पण नंतर संशय वाढणार, मी मित्रांकडे तक्रार करतो हिची, हे पक्के होणार. राग राग चालू होणार. एवढे खरे की या अबोल स्वभावामुळे व संशय व राग, वागण्यातून आणि चेहेऱ्यावर दाखवण्यामुळे माझी फार कुचंबणा होत होती. मी तिला काही बोलू शकत नव्हतो. एक दोनदा प्रयत्न केला तर बोलली "मी कुठे काय बोलले?" नंतरचे कित्येक दिवस मग राग, धुसफूस यांत जात. मला हे रंग पहिल्यांदा दिसलेच नव्हते.

लग्न ही कित्येक वेळा तडजोड असते हे मलाही समजत होते. पण इथे तर संवादच नव्हता. काहीतरी मनात संशय धरुन वागल्यामुळे मलाही काही करता येत नव्हते. मला वाटले होते तसे मोल्ड करणे शक्यच होत नव्हते.

वर्षे जात होती मुलगा मोठा होत होता शाळेत जाऊ लागला होता. घरी आलो की त्याला शिकवण्यात वेळ घालवू लागलो. मुलगा देखिल शांत असे. दंगा मस्ती नाही. मला फार वाईट वाटे, त्याचे लहानपण हरवत होते. तो जास्त बोलत नसे. मला वाटले सगळेच एका दबावात जगत आहोत.

माझ्या कामावर तर जबरदस्त परिणाम होत होता. मनच लागत नसे. डोक्यात संथ विचार येत नसत. वरून साहेबाची बोलणी खावी लागत होती. अपयशाचे ढग सारखे डोक्यावर फिरण्याचा भास होत होता. सारखा एकच विचार येत असे. मुलगा झाला तेव्हा हिने पक्याला माझ्या व अव्याच्या बहिणी बदल विचारल्याचे पक्याने मला सांगीतले होते. या अविश्वासाने मी हादरलो होतो. लग्न विश्वासावर टिकते. इथे तर पूर्ण अविश्वास. आता या आयुष्यात आपल्याला फक्त निभवावेच लागणार, हाच विचार एवढी वर्षे दुःखी करत होता. काय चुकले होते माझे?

मग लक्षात आले. अव्याच्या बहिणीने निर्व्याज, अतिशय खरे प्रेम केले होते असणार. ते मी अव्हेरून तिला दुःखी केले. म्हणून तर हे माझ्या वाटयाला नाही आले ना? नंतर नंतर तर हा विचार दृढ होत चालला व एक सल मनात तयार झाला. जो स्वस्थ बसू देईना.

**सरिता-**

हे अगदीच त्रासून गेलेले दिसत होते. खांदे पडल्यासारखे वाटत. चेहेरा काळवंडत होता. केसांमधेही एक दोन करडे व्हायला लागले होते. मलाच वाईट वाटू लागले. यांच्या या अवस्थेला मीच जबाबदार होते. मी का अशी वागते? का संशय मनातून जात नाही? पण यांना माहीत असूनही हे का सर्व सांगून टाकत नाहीत एकदा? संशय मिटेल, सगळं सुरळीत होईल, असा तरी विचार करावा की नाही? पण मी तरी त्यांना कधी स्पष्ट विचारले आहे? केव्हा केव्हा कोणी नाही पाहून रडून घेते. का रडते मलाच समजत नाही. एक मात्र राहून राहून वाटते. सुखाचे सुंदर ताट वाढलेले समोर आले होते, त्याचा आस्वाद घ्यायला जमलेच नाही आपल्याला.

लग्नानंतर एकदोनदा आईने टोकले. सर्वार्थाने सुख मिळालेय, ते असे रागीट, संशयी वागून टिकणार नाही म्हणाली. मलाही समजत होते. पण मला मन आवरताच येत नव्हते.

वाटे केव्हातरी एखादे भांडण व्हावे. दोघांच्याही मनातील सगळे बाहेर पडावे. पण हे तसे भांडण करणे शक्यच नव्हते. मग मला वाटे आपण शिकलो नाही म्हणून असले काहीबाही सुचते. आणखी निराश होई. ही निराशा मग मनात खदखदत राही. त्याचा परीणाम वागण्यात दिसे. हे व मुलगा मग शांतपणे दुसऱ्या खोलीत निघून जात. मी एकटी पडे. मग मन आणखी संशयी होई. हे मला टाळू लागलेत. माझा संसार नीरस, शुष्क होत जातोय.

माझे लग्न सहजासहजी मला पाहिजे त्याच्याबरोबर, मला पाहिजे तसे झाले होते. खरे तर हा त्यांचा समंजसपणा होता. पण मी त्याला माझा विजय समजले होते. त्या विजयाची नशा मला चढली होती की काय देव जाणे. पण माझेच सर्वांनी ऐकावे हा हट्ट जोपासायला लागले. तो पुरा होत होता. पण समाधान होत नव्हते. कुठेतरी वाटे यात ते काहीतरी दडवतायत. मला फसवतायत. हे सर्व संशय मनात तयार होत. मग हळूच अव्याच्या बहिणीचा विचार डोकावे. मन ढवळून निघे. राग राग होई.

घरात कित्येक दिवस मग भयाण शांतता असे. आटापिटा करून केलेले लग्न मीच कुस्करून मोडून टाकत होते. सावरणे फक्त माझ्याच हातात होते. पण ते कसे हे समजत नव्हते.

हे मात्र दिवसे दिवस उदास होत चालले होते. खांदे हरलेल्या माणसाचे असल्यासारखे वाटत होते. शांत वागण्यात दुःखी माणसाचा भास होत होता. नोकरीतली बढती हातून निघून जात होती. मी एका रसरशीत जीवंत माणसाला पूर्ण संपवत होते, हा विचार आला आणि अक्षरशः घाम फुटला.

कसे बाहेर पडणार यांतून? बाहेर पडलेच पाहिजे नाहीतर सगळ्यांचेच काही खरे नाही. काय करू? मला बदलावेच लागेल.

**सुभाष-**

आज साहेबानी बोलावले व सांगीतले, “नवीन प्रोजेक्ट नाशिकला होतोय तुमची त्यावर नेमणूक करायची आहे. तुम्ही महिन्यातील चार पाच दिवस जाऊन सर्व पहायचे. व बाकीचे काम इथूनच करायचे. हे काम जर बरोबर झाले नाही, तर तुमची नोकरी धोक्यात आहे हे लक्षांत घ्या.”

माझी योग्यता असूनही बढतीसाठी मी दोनदा डावलला गेलो होतो. आता तर नोकरीवर गदा येताना दिसत होती. घरचे प्रश्न बाजूला ठेवून काम करावे लागणार होते तरच निभाव लागणार होता.

मी नाशिकला जाणार समजल्यावर अव्या म्हणाला होता. त्याची बहीण नाशिकलाच असते. मोठी मॅनेजर झालीय. लग्न केलेच नाही. तिला दुसऱ्या कुणाशीही लग्न करोवेसे वाटले नाही. भेटावेसे वाटले तर भेट म्हणाला व तिचा फोनही मला दिला.

नाशिकला येवून चार दिवस झाले. कामे जरा हळू हळूच होत होती. पण इथे घरचे प्रश्न डोळ्याआड झाले म्हणून की काय माझे काम वेग पकडत होते. मग संध्याकाळ मात्र एकाकीपणात जात होती. एक दिवशी विचार केला, अव्याच्या बहिणीला फोन करावा. तिचे नाव आठवायचा प्रयत्न केला. बऱ्याच वेळाने आठवले तिचे नाव अमोल होते. संध्याकाळचे सात साडेसात झाले असतील. मी फोन उचलला.

**संवाद -**

सुभाष “हॅल्लो! ”

अमोल- “हॅलो कोण बोलतंय?”

सुभाष- “हॅल्लो! अमोल का?”

अमोल- “हो! पण आपण कोण?”

सुभाष- “मी अविनाशचा खास दोस्त, ओळखलंत? मी सुभाष”

अमोल- “--------- ”

सुभाष- “हॅल्लो! ” “हॅल्लो! ”

अमोल- “बोला! कुठून बोलताय?”

सुभाष- “नाशिक मधुनच बोलतोय. अविनाशने तुमचा फोन दिला. मी पहिल्यांदाच आलोय नाशिकात. आपण इथेच आहात म्हणून फोन केला. भेटू शकतो का आपण?”

अमोल- “हो! का नाही? केव्हा येता? घरीच या. दिवसा मला वेळ नसतो.”

सुभाष- “ठीक आहे. कधी येवू ते तुम्ही सांगा. मी दोन दिवसच आहे नाशिकमधे.”

अमोल- “आजच येता? मी जेवण करते या. पत्ता देते पाच, रामनगर बंगलोज, पाथर्डी रोड ---- ”

सुभाष- “ठीक आहे, आठ वाजेपर्यंत येतो.”

अमोल- “या! या! पण एकदम नाशिकला कसे?”

सुभाष- “कंपनीने इथे प्रोजेक्ट टाकलाय त्याचे काम माझ्यावरच सोपवलेय.”

**अमोल-**

हा सुभाष कसा काय येतोय? एवढी वर्षे त्याच्याशी बोलायचा, भेटायचा प्रयत्न करीत होते तेव्हा अजिबात दाद देत नव्हता. किती मनःस्ताप व्हायचा. त्याचं लग्न ठरलं आणि पुरी कोसळले. चार दिवस जेवण गोडच लागत नव्हतं. झोप उडाली होती. माझे दुःख आई व अविलाच माहीत होतं. घरात बाबांना तर काही पत्ताच नव्हता. अविनाशला मुली सांगून यायच्या, पण माझ्यासाठी तो चांगल्या चांगल्या मुलीना नकार द्यायचा. एक दिवशी मला म्हणाला "अमू! मी खूप प्रयत्न केले ग, पण तो काही ऐकत नाही. काय ग्रह करून घेतलाय तुझ्याबद्दल माहीत नाही. तुम्ही एकदा तरी भेटावेत म्हणून प्रयत्न केला मी. त्याला प्रेमाने सांगीतले, चिडवले, कित्येक टाँट मारले. पण तो लक्षच देत नाही. तसा तो फार विचारी आहे. आणि खरं सांगू? माझी त्याच्यावर फार भक्ती आहे. हुषार कर्तबगार आहे तो. पण तो दादच देत नाही मला. मला वाटते तू त्याचा नाद सोड. एक मुलगी पाहिलीय त्याने. स्वभावाप्रमाणे नाही म्हणणे कठीण जाणार त्याला. त्याचे लग्न ठरले तर कोसळशील तू. आत्ताच सावर मनाची तयारी कर. बघ मी छानसा मुलगा शोधीन तुझ्यासाठी."

मी शांतपणे मनोमन ठरवले. लग्नच करायचे नाही. त्याची प्रतिमा मनात इतकी बसली होती की दुसऱ्याशी लग्न करून मी प्रतारणा केली असती. आयुष्यभर त्याला नवऱ्यात शोधत बसले असते आणि दोघेही दुःखी झालो असतो. मग लग्नच कशाला करू? भोगायचे आहे तर एकटीनेच भोगू. शांतपणे अविला म्हणाले मी काही लग्न करणार नाही. पुढे शिकते मी. तू लग्न कर. माझ्यासाठी थांबू नकोस. मी आता करीअर करायला बघते. मला लग्नात इंटरेस्ट नाही.

माझी जिद्द आई आणि अविला माहीत होती. अविने आठच दिवसांत लग्न ठरवले. आणखी आठ दिवसात सुभाषचेही लग्न ठरले. पण मला बसायचा तो धक्का बसलाच.

सुन्न मनाने आठ दहा दिवस गेले. मी पुढे शिकत गेले. शहर सोडावे ही इच्छा होती. जिद्दीने आयुष्य बनवले. आज एका कंपनीत मॅनेजर झाले. मन स्थिर झाले होते. आयुष्य अंगवळणी पडले

होते. अतिशय कडक व शिस्तप्रिय मॅनेजरचा शिक्का बसला होता. मधेच केव्हातरी गत आयुष्य नजरेसमोर येई. विषण्णता मन भरून टाके पण ती तेवढ्यापुरतीच.

हे सर्व विस्कटणार का? सुभाष येतोय. आयुष्यात पहिल्यांदाच भेटणार. अवि नेहमी त्याच्या बद्दल सांगतो. लग्न करून तो फार काही सुखी नाही समजले. मग मग तर त्याला नोकरीतही प्रॉब्लेम येवून मागे पडतोय असे माहीत पडले. अवि तर त्याला आपला मॉडेल मित्र समजायचा. पण त्याने त्याच्या घरी येणे जाणे बंद केले होते. तिला म्हणे हे मित्र आवडत नव्हते. बोलली नाही पण चेहऱ्यावरून व वागणुकीतून नकार स्पष्ट दाखवे. हे फार भयानक होते. अशा स्वभावाची माणसे स्वतःचे व कुटुंबाचेही स्वास्थ्य घालवू शकतात. न बोलता बरेच काही करू शकतात व तेही संभावीतपणे नामानिराळे राहून.

सुभाष फार समंजस व विचारी होता. सुभाषच्या बायकोचा असला स्वभाव असेल तर तो पूर्ण दुःखीच होईल.

पण आता तो आपल्याकडे येतो आहे. काय असेल मनात? आपल्या प्रेमाचा स्वीकार करायला तर येत नसेल?

या विचाराबरोबर हादरलेच. आज मी माझं विश्व बनवलंय. केवढा मोठा धक्का बसेल माझ्या प्रतिष्ठेला?. काय नक्की बोलणार आहे तो? पण मला नाही वाटत तो असा काही बोलेल. फार विचारी आहे. त्याची बायको कशीही असली तरी तो तिला धोका देईल असे जराही वाटत नाही. पण केव्हा केव्हा पुरुषाना स्वास्थ्य मिळाले नाही तर बाहेर मैत्री करायला बघतात. तसला तर विचार नाही ना?

मन भरकटत चाललंय. अविलाच विचारू काय प्रकार आहे तो.

**संवाद-**

अमोल- “हॅलो! अवि, अमू बोलतेय.”

अव्या- “बोल अमू! कशी आहेस? फोन केलास मधेच?”

अमोल- “अरे तुझा मित्र आलाय नाशकात. फोन आला होता त्याचा. आत्ता येतोय तो माझ्याकडे. एवढी भेटायला बघत होते तेव्हा नाही भेटला. आता एकदम?”

अव्या- “हे बघ, मीच दिला तुझा फोन नंबर त्याला. मला मनापासून वाटे, आयुष्यात एकदातरी तुम्ही भेटावंत. तुझं यश त्याने जवळून पहावं. ते यश कुठल्या निखाऱ्यांवर उभे केलेस ते अनुभवावं. तुझा सॅक्रिफाईस जवळून अनुभवावा. म्हणून तुझा नंबर दिला.”

अमोल- “अरे पण कशाला रे कोणाला असं हिणवायचं? बघ आजही मी त्यालाच आठवत असते. मीही माणूस आहे. पूर्वीच्या आठवणीना बळी पडले तर किती जणाना नामुष्की सहन करावी लागेल. मनाला आवरणं फार कठीण असतं रे. भीती वाटतेय मला माझीच. मला विचारायचंस तरी. आता काय बोलू त्याच्याशी?”

अव्या- “तू शिकलेली आहेस, प्रगल्भ आहेस, आपले बरेवाईटाचा विचार करणारी आहेस. तू जे काही करशील ते बरोबरच असेल. मी कोणत्याही परिस्थितीत तुला दोष देणार नाही. मला तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे.”

अमोल- “अवि, बरेच वर्षानी असे विचित्र वाटतेय. हुरहुर वाटतेय. मला समजत नाही मी कशी फेस करणार आहे त्याला.”

अव्या- “पहिले भेट तर खरी. तो काय बोलतो ते ऐक तर खरी. मग बोलू आपण.”

अमोल- “हो, चल ठेवते फोन. येईलच तो आता.”

**अमोल-**

हा सुभाष पहिल्यांदाच पहात होते. तो स्मार्ट, ताठ, हुषार चेहेऱ्यावर विद्वतेचं तेज असलेला सुभाष कुठे आणि हा कुठे. माणूस एवढा नामोहरम होतो? हा तर पुरता गळून गेला होता. चेहेऱ्यावर काळजीची जाळी विणली गेली होती. मला फार वाईट वाटले. खूप भरून आले. वाटले आपले प्रेम प्रकट करून त्याला उराशी पकडावे. धीर द्यावा. ऊर्मी जोर पकडू लागली आणि एकदम भानावर आले.

तो कुणाचा तरी होता. त्याच्या बायकोचा, मुलाचा, माझा नव्हता. मी आता माझे विश्व बनवले होते. त्याला तडा जाईल. समाजात एक बदनाम बाई म्हणून ओळखली जाईन. सावरलेच पाहिजे.

तो बाकी सर्व बोलत होता कामा विषयी, नशिकातल्या प्रोजेक्ट विषयी. पण स्वतःबद्दल किंवा घराबद्दल काहीच बोलत नव्हता. त्याचे दुःख कमी करायला त्याला मन मोकळे करायला लावलेच पाहिजे होते. पण मी पहिल्यांदाच भेटत होते. मला जरी तो जवळचा वाटत होता तरी त्याला काय वाटते कुठे माहीत होते.

एकदम प्रश्न निघून गेला. "तुझी सौ कशी आहे? मुलगा काय म्हणतो? तो जरा चमकलाच. बरे आहेत एवढेच म्हणून गप्प झाला. मला त्याची सर्व परिस्थिती माहीत होती. बोलून गेले. तू मित्रांपासून दूर गेलायस, तोडला गेलायस, घरी देखील संशयाच्या जाळयातच फिरत असशील? मला पूर्ण माहिती आहे तुझ्या बद्दल. तुझे लग्न यशस्वी असते तर आला असतास का रे तू इथे?

मी तुझा पाणउतारा करत नाही पण आपण सरळ सरळ प्रश्न काय आहेत?, त्याची उत्तरं मिळतात का? हे जर बोललो तर फार बरे होईल. मी तुझा हा अवतार पाहू नाही शकत. मी जीवापाड प्रेम केलेय ते अजून तसेच आहे. तू पडलेला, हरलेला, दुःखी झालेला मला चालणार नाही.

गैरसमज करून घेऊ नकोस. मी काही तुला घटस्फोट घेऊन माझ्याशी लग्न करण्याचा प्रस्ताव करीत नाही. पण माझा पक्का विश्वास आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर असतेच. तुझ्याही प्रश्नाचे उत्तर सापडेल. पण तू स्पष्ट बोललास तर. मी काही तुझ्या सारखी प्रोजेक्ट मॅनेजर नाही. मी जनरल मॅनेजर एच्. आर. डी आहे. मी माणसांची मने ओळखते, वाचते मग त्यावर फुंकर घालते किवा वळवते, प्रसंगी दम देऊन वळवते. बघ तू ठरव.

मी जेवायला घेते. तुझ्या आवडी निवडी मला काही फारशा माहीत नाहीत. बघ जेवण आवडते का? आणि तुझी आवडही सांग. म्हणजे उद्या तसे जेवण करेन. जोपर्यंत इथे आहेस तोपर्यंत रात्री इथेच जेवायला येत जा. बाहेरचे खावून तब्येत बिघडवू नकोस. हा मात्र हुकूम समज.”

नंतरचे दोन दिवस गप्पात गेले. तो बोलून मोकळा होत होता तसतसा रिलॅक्स होतोय ते दिसत होते. त्याचा चेहरा बदलत जात होता. शेवटच्या दिवशी तो गंभीर, काळजीचा चेहरा घेऊन आलेला, विनोद करू लागला. मी मनात म्हणाले “असाच आनंदी रहा रे. मला तू असाच आवडतोस. मी नक्की तुझे प्रश्न सोडवायचा मार्ग शोधीन.”

मग निरोपाच्या वेळी म्हणाले “पुढच्या वेळी येशील तेव्हा इथेच येत जा संध्याकाळी.”

**सुभाष-**

मी डायरी लिहायला घेतली. गेले तीन दिवस खूप गप्पा झाल्यात. अमोल केवढी प्रगती करून गेलीय. मॅनेजमेंटचा अभ्यास केव्हा केला हिने? छान बंगला आहे. तोही स्वतःचा. करीअर सुंदर केलीय. पूर्वीचे नट्टेपट्टे नाहीत. पण एकंदर जामानीमा टापटीपीत दिसला. माझ्याकडे रोखून पहात होती. मनात शिरून वाचायचा प्रयत्न करतेय असे वाटत होते. पहिल्यांदा भेटी टाळणारा, प्रेमाला अव्हेरणारा आज स्वतः होऊन भेटायला आलाय, त्याचे कारण शोधीत होती. मधेच डोळ्यांतून अतीव प्रेम पाझरत होते, तर मधुनच विचार परतवून कणखर होताना दिसत होती. तिच्या मनात माझ्या येण्याने खूप मोठे वादळ उठले होते. ते आवरण्याचा आटोकाट प्रयत्न ती करीत होती. माझ्या येण्याने कदाचित तिचा गैरसमज झाला की काय, अशी शंका मला आली. एक हरलेला, बेचैन माणूस आपली चूक सुधारायसाठी तर आला नाही ना, असे वाटले की काय तिला?

माझ्या चेहेऱ्याकडे बघून मात्र विरस झालेला दिसला. गप्पांच्या ओघात एक समजले, माझी इथ्थंभूत माहिती तिच्याकडे होती. बहुदा अव्याने पुरवली होती. आपले शिक्षण, करीअर, नोकरीतील यश सगळ्याच आढावा सांगीतला. वर म्हणाली आपण ठाम असलो तर कोणतीही परिस्थिती आपल्याला पाहिजे तशी करू शकतो. पराभव पहिल्यांदा मानला की कायम चिकटतो. पराभवावर मात केली की आयुष्य झळाळून ऊठते. स्वच्छ विचारांचा एक सुंदर प्रवाहच तिने मनात तयार केलाय. आता फार चांगला स्टेटस मिळवलाय तिने. एक हुशार. कर्तबगार स्त्री म्हणून ओळखली जातेय ती. मी सर्व ऐकत होतो. पहात होतो. आणि खजील होत होतो.

मग तर तिने बाँब टाकला सरळ माझ्या परिस्थितीवरच बोलणे चालू केले. जबरा अनुभव दिसला. तिचे बोलणे अजूनही कानात गुंजते आहे. ‘प्रत्येक प्रश्नाला उत्तर असते.’ मी तिच्या बोलण्याने पुरता भारावलो होतो.

मग मला म्हणाली, हरणे तिला मान्य नाही. लग्न हेच काही आयुष्यातले सर्वस्व नाही. कामात, व्यवसायात पुरते झोकून दिले व माझा नकार मनावरुन पुसून टाकला. मलाही तसाच माझा पराभव पचवायला सांगीतला. अत्यंत स्वच्छ शब्दात कळकळीने म्हणाली " मी सर्व काही सहन करू शकते, पण तुझा पराभव  पहावणार नाही मला. या सर्वांवर मात कर. स्वतःचं वेगळं विश्व बनवायचा प्रयत्न कर, मोठा हो.

केव्हा केव्हा अपराध्यासारखे वाटते रे. तुझ्या या परिस्थितीला मी जबाबदार आहे. असेच वाटत रहाते. तू एकदाही भेटला नाहीस की बोलला नाहीस. तरी देखील तुझ्या बायकोने तुझ्यावर नाहक संशय घेतला. तुझे आयुष्यच ढगाळले रे त्याने."

हे बोलली खरी पण त्यात तिचा काय दोष? मी आणि ती कधी भेटलोच नव्हतो. माझ्या बायकोचे संशय निरर्थक होते. संशय घेऊन स्वतःला चिमटे घेत बसणे हा तिचा स्वभाव झाला होता. त्याच्यावर मला उपाय सापडत नव्हता.

मी डायरी बाजूला ठेवली व झोपायचा प्रयत्न करू लागलो. झोप पुरती उडून गेली होती. नाशिकच्या राहीलेल्या दोन्ही संध्याकाळी तिच्याच घरी काढल्या. तिने निखळ मैत्रीचे छान रुप दाखवले व मी खूप भारावलो. एकच मनोमनी ठरवले, मी हरणार नाही.

मी पुढच्या प्रत्येक वेळी गेलो तेव्हा संध्याकाळ तिच्या घरी काढू लागलो. जेवून झाले की मी दहा साडेदहाला गेस्ट हाऊसवर परते. तिच्या बोलण्यात एकच असे. "तुझ्या बायकोला कसेही वागू दे, तू त्याला महत्वच देऊ नको. पहिल्यांदा जळफळाट होईल पण मग तीच अगतीक होईल. हळू हळू आपले मार्ग, आपले संशय, आपला राग तुझ्यावर परिणाम करत नाहीत हे पाहून तीच दुःखी होईल व मग आपला आनंद कशात आहे ते शोधेल. हे झाले तरच तू कायमचा सुखी होशील. जरा कडू औषध आहे पण घ्यावेच लागेल असे आहे."

**सरिता-**

गेले काही महिने हे नाशिकला जातायत. केवढा फरक होत गेलाय. हे पूर्वीसारखे ताठ चालू लागलेत. अविनाश, पक्याला पकडून आणू लागलेत. मुलाशी वेगवेगळे खेळ खेळू लागलेत, मधुनच केव्हातरी माझ्याशी चांगले बोलू लागलेत. काय असेल? एकदम एवढा फरक कसा पडला? माझ्या रागाचा, संशयाचा काहीच परीणाम होत नाही? माझ्याकडे विशेष लक्ष देत नाहीत. आनंदात असतात.

मग एकदम आठवले. अविनाशची बहीण नाशिकला असते. डोके एकदम गच्च होऊ लागले. हे तिला भेटत असणार. आपला संसार आता नक्की भरकटणार, असा विचार येऊन हैराण झाले. संशयाची भुते मनात धिंगाणा घालू लागली.

दुसऱ्या दिवशी हे कामावर गेले. व मला आठवले हे दररोज काही तरी लिहीतात. काय लिहीतात ते वाचून तरी पाहू. मी वही काढली तारीखवार सगळे लिहीत गेले होते. वाचता वाचता नाशिकला पहिल्यांदाच गेले तो दिवस पूर्णपणे लिहीलेला आढळला. वाचत गेले. म्हणजे हे त्या अव्याच्या बहिणीला भेटायला गेलेच. रागाचा पारा जसा चढला तसाच हळू हळू उतरू लागला. किती स्पष्ट सगळे लिहिले होते.

म्हणजे हे त्या अमोलला, अव्याच्या बहिणीला, आमच्या लग्ना अगोदर भेटलेच नव्हते? बोललेही नव्हते? आणि मी संशय घेत बसले होते इतके दिवस. स्वतःचाच नाही तर त्यांचासुद्धा आनंद मी हिरावून घेतला होता. मला माझीच घृणा वाटायला लागली.

पुढच्या नाशिकच्या प्रत्येक भेटीत हे अमोलकडे दररोज जात होते. तेथील प्रसंग जसेच्या तसे ते लिहून ठेवत होते. त्यांच्यातील मैत्र जबरदस्त होते. मला सर्व गोष्टी स्पष्ट, स्वच्छ झाल्या होत्या. मी एक अगदी लहान, खुजी, कुरुप बाई असल्याचा भास होऊ लागला. नाही मलाच मनाने मोठे व्हायला

लागेल. या पुढे या अत्यंत प्रामाणिक माणसाला जरा देखील दुःख देता नये. फार माया करायची. फार मानाने वागवायचे त्यांचेच सर्व ऐकायचे. मनात निर्धार होत होता.

"पण त्यांनी तिच्याशी अजून जवळीक केली तरी?" हा प्रश्न स्वभावाप्रमाणे संशय उभा करू लागला.

मी ठामपणे मनाला बाजावले "हो तरी सुद्धा, नाहीतरी या सगळ्याला माझा संशयी स्वभावच जबाबदार होता. मीच त्यांना या नसलेल्या नात्याकडे परत ढकलले होते. माझा मीच घात केलाय. मग तो दुसऱ्यानी का सहन करायचा. प्रत्येकाला आनंद, जिव्हाळा लागणारच. मी जिव्हाळा नाही दिला आणि त्यांनी तो शोधला तर काय चूक? त्यांनी अमोलशी अगदी सबंध वाढवला तरी तो दोष माझाच असणार.

पण म्हणून काय झाले? त्यांनी का नाही सांगीतले मला? का दडवतात अमोलला भेटलेले? डोके परत चढू लागले. नाही! यावेळी काही झालं तरी त्या सटवीची भेट घ्यायचीच. पाहू तरी एवढी कोण आहे ती.

ठरले मग. पण त्यांना संशय येणार नाही असंच बोललं पाहिजे. राग, संशय अजिबात दिसता नये.

मग मनातील राग, हे यायच्या वेळी काढून टाकू लागले. चेहेरा हंसरा ठेवू लागले. त्यांना आवडतात ते पदार्थ बनवू लागले.

सुभाष-

हल्ली एकदम फरक जाणवतोय हिच्यात. फार गोडीगुलाबीत वागत असते. कसा काय हा फरक? माझ्या आवडीचे पदार्थ आवर्जून बनवतेय. सकाळी माझी सगळी तयारी करून रुमाल पाकीट अगदी हातात देते. बाहेर पडलो की बाय करायला गॅलरीत उभी असते. लग्नानंतर काही महिन्यातच तिनेच बंद केलेली प्रथा परत कशी चालू केली? वादळा अगोदरची चिन्हे तर नव्हेत ना ही? असे काय घडले की ही एवढी बदलतेय? आता चांगल्या मूडमधे आहे तर आपणही मूड नको घालवायला.

ब्रेव्हो! अमोलचा सल्ला नक्की लागू पडला वाटते. चार पांच दिवसात नाशिकला जायचे आहे. त्यावेळी सांगू तिला. एवढ्या लवकर एवढा परिणाम होईल वाटले नव्हते. कशी काय बदलली एवढी? अमोलचे असाधारण प्रेम की प्रोफेशनल ऍडवाईस कशाचा परीणाम आहे हा?

**संवाद-**

सुभाष- “उद्या मी नाशिकला जाणार आहे. यावेळी काम वाढले आहे. मला कदाचित जास्त दिवस रहावे लागेल.”

सरिता- “अहो! यावेळी तुम्ही नाशिकला आम्हाला घेऊन चला ना? गुड्डूला सुट्टी आहे शाळेला. ”

सुभाष- “मी तयार आहे. पण सबंध दिवस मी कामात असणार. तुम्हाला गेस्टहाऊसमधे कंटाळा नाही येणार?”

सुभाष- “नाही. माझी ओळख करून द्या अमोलशी. आम्ही तिच्याबरोबर फिरू.”

सुभाष- “ती नोकरी करते. फार कामात असते. तिला अगोदर विचारावे लागेल.”

सरिता - “मग विचारा तिला व ठरवा.”

सुभाष- “नाही मी विचारलेले बरोबर दिसणार नाही. हा फोन नंबर घे. तूच विचारलेस तर बरे. चला मला उशीर होतोय मी निघतो.”

..........

..........

सरिता - “हॅल्लो! कोण अमोल का?”

अमोल- “हो! आपण कोण?”

सरिता - “मी सरिता. आपला खास मित्र सुभाषची पत्नी. यावेळी नाशिकला यायची इच्छा होती. यांना विचारले मी. पण ते म्हणाले ते दिवसभर कामांत असणार, आम्ही हॉटेलमधे कंटाळून जाऊ. मग तुमचा विषय आला. तुमची कंपनी मिळाली तर भटकू नाशिक. वेळ मिळेल का तुम्हाला?”

अमोल- “माझी काळजीच करू नको तू. आजच रजा घेते मी आठ दिवसांची. जरूर ये. मला आवडेल तुझी कंपनी. आणि खरं सांगू? तुला भेटायची माझी केव्हापासूनची इच्छा होती. जरूर ये.”

सरिता - “थॅंक्स! मी सांगते यांना तसे. पण तुम्ही फोन करा त्यांना.”

अमोल- “हो जरुर करते फोन मी. चल ठेवू? आल्यावर खूप गप्पा मारू.”

...........

...........

अमोल- “सुभाष? .... अरे सरिताचा फोन होता. तिला नाशिकला यायचंय तुझ्याबरोबर. मग घेऊन ये ना. मी घेते रजा आठवड्याची. काळजी नको करूस.”

सुभाष-“मला तुझी काळजी वाटते. तुला माहीत नाही केवढा रागीट स्वभाव आहे ते. तुझा अपमान झालेला मला नाही चालायचा. मला समजत नाही तिला कसे माहीत पडले नाशिकमधे आपण भेटतो ते. म्हणूनच बहुदा हा घाट घातलाय तिने.”

अमोल- “सुभाष तू माझी जरा सुद्धा काळजी करू नकोस. मी पाहीन माझा अपमान होणार नाही ते. आणि झालाच तर तो तुला माहीत पडणार नाही याची काळजी घेईन. उलट ही संधी आहे तिचे मन वाचण्याची. समजेल आपल्याला, ती अशी का वागते ती. मग रिलेशन कसे सुधारता येईल तेही ठरवता येईल. तू सुखी व्हावास हीच माझी खरी इच्छा आहे. होप फॉर द बेस्ट.”

सुभाष-“चल मग. भेटूच. विश्वास आहे, तू काहीतरी चांगलेच करशील.”

अमोल- “थॅंक गॉड! शेवटी माझीही तपश्चर्या फळाला येतेय तर. एक नखरेल वाटणारी मुलगी विश्वासपात्र तरी ठरली.”

सुभाष-“चल ठेवतो आता.”

**सरिता-**

कशी बोलत होती? म्हणे भेटायचंय मला. पाहू काय बोलते ते. मात्र यांच्या भेटी गाठी बंद करायला लावायच्या.

पण जमेल मला? पाहू काय संभाषण होईल त्यावर ठरवू आयत्यावेळी. पण तिला जराही काही वाटले कसे नाही? खणखणीत आवाजात ये म्हणाली. मला समजलेय माहीत पडल्यावर गोंधळली घाबरली कशी नाही. एकतर जबरी बाई असणार किंवा यांचे तिचे तसे संबंधच नसणार. मी फार संशय घेऊन वागत तर नाही?

तिथे जर काही भांडण झाले तर? परत यांचे बिनसणार तर नाही? आजकाल मजेत असतात. घरांत मुलाबरोबर हंसत खेळत असतात. सगळं परत बंद होईल.

पाहू कसे काय होते ते. उद्या जायचंय. तयारी करा म्हणून फोन आलाय.

**संवाद-**

अमोल- या! या! कसा झाला प्रवास?

सुभाष- प्रवास छान झाला. तुला ओळख करून देतो. ही सरिता, पत्नी. हा गुरूनाथ माझा मुलगा. आम्ही घरी त्याला गुड्डूच म्हणतो.

अमोल- गोड आहे रे. गुड्डू बाळा ये! माझ्याकडे ये. सरिता बस हां आलेच पाणी घेऊन.

......

......

अमोल- गुड्डू! बाळा हे चॉकलेट तुला. घ्या पाणी घ्या. काय ग सरिता नाश्ता काय करू? सुभाषला काय आवडतं? तुला काय आवडतं?

सरिता - नकोय काही. बस स्टँडवर केलाय नास्ता.

अमोल- अरे सुभाष तुला जायचे आहे का कामावर? पहा तुझी वेळ सांभाळ.

**सरिता-**

औपचारिक बोलणीच चालललीत. बाई अतिशय सरळ दिसते. चेहेरा किती शांत, प्रभावी आहे. डोळे तर एकदम खोल काहीतरी आपल्यात शोधतायत असे वाटले. सावळी आहे पण चेहेऱ्यावर एक न विस्कटता येणारं गांभीर्य आहे. दबाव टाकतं समोरच्यावर.

नाश्ता करून हे गेस्टहाऊस वर गेलेत. तिथूनच कामावर जाणार म्हणाले. संध्याकाळी सात साडे सातला येतो म्हणालेत. तोपर्यंत आपण हिच्या तावडीत सांपडणार. हिच्यासमोर माझा टिकाव लागणार का?



**संवाद-**

अमोल- काय ग सरिता कसल्या विचारांत गुरफटलीस? बी कंफर्टेबल, पाहुणी समजू नकोस. लवकर आटपून आपण जरा भटकून येऊ. बाहेरच जेवू. मग दुपारी आराम करा. चालेल ना?

सरिता - हो तुम्ही म्हणाल तसं.

अमोल- चल मग तयार व्हा दोघे जणं. आज तुला पंचवटी व त्रिवेणी संगमावर नेते. चालेल ना? नाहीतर तू काही ठरवलं असशील तर सांग.

सरिता - नाही, तुम्ही काय ठरवाल ते.

अमोल- बरं मग चला तयार व्हा.



**सरिता-**

सगळं भटकून झालं. त्रिवेणी संगम पाहिला. जेवलो व घरी आलो. एक पाहिलं. अमोल फार उघडपणे बोलणारी दिसली. प्रेमळ, हंसरी आणि माया करणारी पण. कुणाबरोबर लवकर न बोलणाऱ्या गुड्डूला तिने बोलता केला होता. तो तिच्याबरोबरच हात धरून चालत होता. ती त्याला रामायणाच्या गोष्टी सांगत होती. संगमावर तर तिने त्याला पाण्यात उतरवले. एकमेकावर पाणी उडवून ते खेळले. तिने हे आधी ठरवले असावे. तिने एका पिशवीत टॉवेल व त्याच्यासाठी नवे कोरे कपडे आणले होते. केवढा पुढचा विचार करून ठेवते ही बाई असे वाटले.

जेवताना पण गुड्डूला आवडणारे पदार्थ मागवत होती. मला नवल वाटत होते. गुड्डू एवढा कसा बोलू लागला? काय जादू केली हिने?

घरी आलो. मस्त झोप काढली. अगदी पांच वाजता उठलो. आता कुठे जायची इच्छा नव्हती. अमोलनेही म्हटले. गुड्डू अजून झोपलाय आपण गप्पाच करू.

मला तेच पाहिजे होते. तिचे मन वांचायचे होते. हॉलमधे गेलो. आता मला धडधडू लागले. विषय कसा सुरू करणार? कुठेतरी धागा पकडता आला पाहिजे.

**संवाद-**

अमोल- बोल! कसं चालयंय तुझं? तुझा गुड्डू मात्र एका दिवसांत दोस्त झाला माझा. फार अबोल नाही. सुभाष म्हणत होता तो अबोल आहे म्हणून.

सरिता - घरी नाही बोलत एवढा. मला नवल वाटले तुमच्याबरोबर फार लवकर मिसळून गेला. (मनात म्हटले कुणालाही आपलेसे करण्यांत पटाईत दिसते)

अमोल- अग कुणालाही निर्भेळ प्रेम, माया मिळाली की तो माणूस आपलासा होतोच. लहान मुलं तर फार लवकर होतात. बरं आपण सरळ विषयाकडेच वळूया. मला माहीत आहे. तू काही नाशिक फिरायला आली नाहीस. मला भेटायला आली आहेस. ‘ही कोण बाई माझ्या संसारात डोकावतेय’ हा प्रश्न तुला सतावतोय. मला जाब विचारायला किंवा माझ्याशी भांडायला तू आली असशील असे वाटतेय मला. एक सांगते मी भांडत नाही, प्रश्न सरळ हाताळते. खोटे बोलत नाही. त्यामुळे तू तुझ्या सगळ्या शंका कुशंका मला स्पष्ट विचारू शकतेस. मला टोचेल वाईट वाटेल अशी जरा देखील शंका येऊ देऊ नकोस. बोल.

सरिता - (माझी बोबडी वळायची वेळ आली होती. सरळ सरळ मला मन उघडं करायला सांगत होती ही बाई. कसं शक्य होतं मला सरळ तोंडावर आरोप करणं? मी चांचरत बोलू लागले) काही नाही. माझ्याशी लग्न करून हे खूष नाहीत असेच मला वाटत रहाते. अगदीच गप्प असतात.

अमोल- हे तू त्याला कधी सरळ शब्दात विचारलेस का? मला विचारून काय फायदा? तू सरळ मला काय विचारणार ते विचार ना. मी माझ्या बद्दल बोलू शकते.

सरिता - (बापरे कठीण आहे. तिच्याबद्दल तिलाच विचारायचे म्हणजे आरोप केल्यासारखेच होणार. कसे विचारू?) नाही, गेली दोन तीन वर्षे हे अगदीच नर्व्हस असत. बोलत नसत.

नाशिकला यायला लागले आणि एकदम बदल आला. मग समजले ते तुम्हाला भेटतात. लग्नाअगोदरही तुमची मैत्री होती. मग माझे मन खात होते. म्हणून तुम्हाला भेटावेसे वाटले. (काही बाही बोलले पण मलाच बरोबर वाटले नाही.)

अमोल- हे बघ तुमच्या लग्ना अगोदर आमची मैत्री होती हे खरं नाही. आम्ही कधी भेटलो, बोललो नव्हतोच. एक सत्य आहे. मला सुभाष आवडायचा त्याच्याशी लग्न व्हावं असं फार वाटायचं. पण त्याने मला पूर्णपणे टाळलं. मी ते सर्व पचवलं. करीअर केली आणि नाशिकला आले. त्यानंतर तो आत्ता भेटायला आला.

आणि हे बघ मनातले संशय काढायचे असतील तर सगळ्या शंका स्पष्ट विचार. मला जराही वाईट वाटणार नाही. मनात ठेवत राहिलीस तर तुझा संसार कसा सुखाचा होईल? बोल.

सरिता - (बापरे ही किती सरळ, उघड बोलते. कसं बोलणार हिच्या बरोबर?).......

अमोल- अग! गप्प का, बोल ना. तू नाशिकहून जायच्या आधी तुझ्या मनातली सगळी जळमटं निघून गेली पाहिजेत. तुझा आणि सुभाषचा संसार सुखाचा झाला पाहिजे. ही माझी इच्छा आहे. विचार!

सरिता- (हळू हळू मला कापरे भरू लागले. घशाला कोरड पडू लागली) नाही पण कुठल्याही बाईला आपल्या नवऱ्याची, संसाराची काळजी वाटतेच ना? कित्येक शंका मनात येतात जीव घाबरा होतो. (माझा आवाज कापत होता, हे मलाच समजले.)

अमोल- पण हे तू कधी त्याच्याकडे स्पष्ट बोललीस का? संसारात संवाद पाहिजेच. केलास का तू? आपल्या मनातले दुसऱ्याला समजले तर पाहिजे. आणि तुझ्या संसारात मी अडथळा

आणीन असे वाटले म्हणून तू मला भेटायला आलीस? नवऱ्याला विचारता नाही आले तुला? मग ऐक आता मी तुला सर्व सांगते

मी अगदी जीव लावून बसले होते सुभाषवर. पण तो मला टाळी, भेटत नसे, बोलतही नसे. तुमचे लग्न ठरले आणि अगतीक होऊन गेले होते. मग ठरवले नखरे सोडायचे करीअर करायची. शिकत गेले. नोकरीही छान मिळाली. लवकर लवकर बढती मिळत गेली. आज जनरल मॅनेजर आहे. लग्नाचा विचार कधी केलाच नाही. जीव लावला तो एकाचवर.

आणि आता तोच परत आयुष्यात डोकावला. क्षणभर मन लालची झाले. पण प्रगल्भ मनाने टोकले. कुणाचेही काही हिरावून घेणे हे घृणास्पद आहे. तुझे सौभाग्य कसे हिरावणार? अजूनही तू त्याची पत्नी होतीस.

त्याचे मन समजले. त्याला तुझ्यापासून फारकत नको होती. तू गोडीगुलाबीत रहावंस हेच त्याला पाहिजे आहे. पण तू आपले संशय, राग उराशी कवटाळून बसली आहेस. त्याला त्याच्या यातना असह्य होत होत्या. पण माझ्याकडेही तो तुझ्या बद्दल काहीच बोलत नसे. मला सर्व समजायचे ते अविनाश कडून. त्याचा फार जीव होता मित्रावर. तो मला भेटायला आला तेव्हा मी वाट पाहिली काही बोलेल त्याची. पण तो कधीच बोलला नाही. मीच त्याच्या गप्प राहाण्यावर बोलले. सगळे माहीत असल्याचे सांगीतले. एवढ्यांदा भेटलो पण आजपर्यंत तुझ्याबद्दल त्याने ब्र ही उच्चारलेला नाही. यालाच सुसंस्कृतपणा म्हणतात. आमची मैत्री तुझ्या वागण्यामुळे झाली. माझ्याकडे तो इतर बाबतीत खूप बोलतो. मन मोकळे बोलतो. जे त्याला तुझ्याबरोबर बोलायला आवडले असते. पण तू दरवाजे बंद केले होतेस.

तुझ्या रागाने, संशयी स्वभावाने आणि अबोल्याने त्याची मनःस्थिती पुरती खचवलीस तू. स्वतःच्या संसाराला आणि त्याच्या करिअरला बरबाद करीत गेलीस. अजूनही करतेच आहेस. मी यासाठी तुला संगमावर घेऊन गेले होते. कसे सगळे प्रवाह गुण्यागोविंदाने एक होतात. पुढे वहात रहातात

ते दाखवायचे होते तुला. निसर्ग आपल्याला खूप चांगले चांगले शिकवतो पहाण्याची संवय आपल्याला लावावी लागते.

मला सुभाषबरोबर माझे काय संबंध आहेत हे विचारायला आलीस ना? मग ऐक. आत्तापर्यंतरी आम्ही फार चांगले मित्र आहोत. आणि ते तसेच रहाणार आहोत.

पुढचे सर्व तुझ्या हातात आहे. आमची मैत्री, तुझे संसारसुख व सुभाषची करीअर याचा आनंद तू उपभोगणार आहेस की असाच राग, संशय पकडून त्याची वाट लावणार आहेस. तूच ठरवायचे आहेस.

एक लक्षात ठेव, मी अजूनही त्याच्यावर जीव लावते. तो असा पडलेला, हरलेला मला मुळीच आवडणार नाही. तुला काय संशय आहेत ते स्पष्ट बोल त्याच्याशी. त्याची मुस्कटदाबी करू नकोस. आणि असेच चालले तर तू त्याला गमावशील. पण नुकसान तुझेच होईल. मी आत्ता त्याची फक्त मैत्रीण आहे. पण त्याला सांवरायचे आले तर मी सर्वस्व देऊ शकते हे लक्षांत ठेव. ही धमकी नव्हे. वस्तुस्थिती आहे.

आजही तसे झाले असते. पण आम्ही दोघेही संयमी आहोत. तुझे संशय असेच चालू राहिले तर तू त्याला गमावशील आणि तो माझ्याकडे येईल. भानावर ये जरा.

**सरिता-**

मी थरथरत बसले होते. कापरे वाढतच होते. मन स्वच्छ झाले होते. अमोल बद्दल खूप आदर वाटू लागला होता. एवढ्यात हे आले आणि मी बेशुद्ध होऊन सोफ्यावरच कोसळले. शुद्ध आली तेव्हा मी बेडवर होते. अंग तापाने फणफणले होते. तरी देखील मला बरे वाटत होते. हे डोक्यावरून हात फिरवत बसले होते. समोरच अमोल उभी होती. तिला बघून मी हसले तशी पुढे येवून म्हणाली फार आघाती बोलले का ग? एवढी? ताप येण्याएवढी घाबरलीस? मी फक्त हंसले.

मग यांना म्हणाली, अरे डॉक्टरकडे न्यायची जरूरी नाही. होईल सकाळपर्यंत बरी.

रात्रभर तापाच्या ग्लानीतच होते. सकाळी उशीरा उठले. हे उशाशीच बसले होते. समोर अमोल होती. मला उठलेली बघून म्हणाली कॉफी घेऊन येते. यांनी पाणी प्यायला दिले व मी खरोखरच शरमले. पण आता मला सुद्धा अमोल आवडू लागली होती. जगच सुंदर वाटू लागले होते.

दोन दिवस फार मजा केली व परतलो.

............

आज कित्येक वर्षे होत आलीत. आम्ही नाशिकलाच कायमचे रहायला आलोत. हे या युनीटचे व्हाईस प्रेसीडेंट झालेत. अव्या, पक्या, त्यांच्या बायका, मुले सगळे दरवर्षी एकदा तरी आठ दिवस आमच्या घरी येतात. अमोलही येते. जोरदार उत्सव होतो.

मी अमोलने दाखवलेला त्रिवेणी संगम नजरेसमोर ठेवते व सर्वांच्या आनंदात सहभागी होते. खरंच खूप मजा येते मिळून मिसळून वागण्यात.

# समाप्त

त्रिवेणी संगम

अरुण कुळकर्णी



ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. त्याशिवाय वर्षाला सुमारे तीस ते चाळीसलाख वाचक वेबसाईटवरून पुस्तके डाऊनलोड करतात.

अर्थात याने आमचं समाधान नाही. सुमारे बाराकोटी मराठी माण्सांपैकी किमान अर्धे म्हणजे सहा कोटी लोक “वाचक” व्हावेत अशी आमची

इच्छा आहे. माउलिंनी सांगितलंय. “जो जे वांछिल ते तो लाहो”. आमचीही वांछा “तो” पूर्ण करील. करीलच.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते easahity@gmail.com या पत्त्यावर पाठवा बरं!